रायगड, नवी मुंबई
# रामप्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक २९
www.ramprahar.com
मंगळवार, १५ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

मुंबईत १२ डब्यांच्या लोकल आता १५ डब्यांसह धावणार/२
कर्जतच्या बेकरेत अवैध हातभट्टी उद्ध्वस्त/५
आगरदांडा येथे रेल्वे धावणार; भूसंपादनासाठी नोटीस/७

## हिमाचल प्रदेशमध्ये पावसाचा कहर; ५० जणांचा मृत्यू



**शिमला :** हिमाचल प्रदेशमध्ये पुन्हा एकदा पावसाने हाहाकार माजवला आहे. राज्यात भूस्खलन आणि जोरदार पावसामुळे २४ तासांत ५०पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला आहे. मृतांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. माध्यमांशी बोलताना हिमाचल प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्यात मागच्या २४ तासांमध्ये ५०पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला आहे. २०हून अधिक नागरिक अडकून पडलेले असून बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. शिमलाच्या समर हिल भागात भूस्सखलन झाल्याने सोमवारी (दि. १४) नऊ जणांचा मलब्याखाली अडकून मृत्यू झाला. एनडीआरएफचे अधिकारी नफीस खान यांनी सांगितले की, येथे ३० ते ४० लोक अडकल्याची शक्यता असून घटनास्थळी प्रचंड मलबा जमा झाला आहे. आमच्या १४ टीम बचावकार्यासाठी पोहचल्या आहेत. एसडीआरएफची टीमही दाखल झाली आहे.

# स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्यांचे सदैव स्मरण केले पाहिजे

### आमदार प्रशांत ठाकूर यांचे पनवेल येथे प्रतिपादन

- विभाजन विभिषिका चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन
- स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांचा सत्कार





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यांनी आपले सर्वस्व त्यागले त्यांचे स्मरण सदैव होत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. १४) पनवेल येथे केले. ते विभाजन विभिषिका चित्र प्रदर्शन उद्घाटन समारंभात बोलत होते.

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव विविध कार्यक्रम आणि संकल्प करून साजरा होत आहे. त्या अंतर्गत १४ ऑगस्ट हा दिवस विभाजन विभिषिका स्मृती दिवस म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली साजरा करण्यात येत आहे. फाळणीत विस्थापित झालेल्या आणि प्राण गमावलेल्या लाखो बंधू-भगिनींच्या संघर्ष व बलिदानाच्या स्मरणार्थ या दिनानिमित्त भाजपच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात फाळणीच्या भयंकर स्मरण दिनाची कल्पना नवीन पिढीला मिळावी यासाठी दोन दिवसीय चित्र प्रदर्शन भरवण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. **(पान २ वर..)**




## स्वातंत्र्य दिनानिमित्त पनवेलमध्ये आज ध्वजारोहण, तिरंगा बाईक रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



भारतीय स्वातंत्र्याच्या ७६व्या वर्धापन दिनानिमित्त मंगळवारी (दि. १५) सकाळी १०.३० वाजता पनवेल तालुका व शहर भाजपच्या वतीने ध्वजारोहण व वंदन समारंभ तसेच युवा मोर्चाच्या वतीने तिरंगा बाईक रॅली होणार आहे.

शहरातील मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृह येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ होणार असून त्यानंतर युवा मोर्चातर्फे शहरात तिरंगा बाईक रॅली होईल. ही रॅली तेथूनच सुरू होणार असून पंचरत्न हॉटेल चौक, शनी मंदिर, वावेश्वर हॉटेल, कापड बाजार, जय भारत नाका, विरूपाक्ष मंदिर, आदर्श कॉर्नर अशी फिरून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे समारोप होणार आहे. या समारंभास पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि शहर अध्यक्ष जयंत पगडे यांनी केले आहे.

## मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते रायगडात होणार मुख्य ध्वजारोहण

**अलिबाग : प्रतिनिधी**



भारतीय स्वातंत्र्याच्या ७६व्या वर्धापन दिनानिमित्त रायगड जिल्ह्यातील मुख्य शासकीय ध्वजारोहण राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते अलिबाग येथील पोलीस परेड मैदानावर मंगळवारी (दि. १५) सकाळी ९.०५ वाजता होणार आहे.

या राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास शासकीय अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी मोठ्या संख्येने राष्ट्रीय अथवा समारंभीय पोषाखात २० मिनिटे अगोदर कार्यक्रमस्थळी उपस्थित राहावे तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया कोणतीही बॅग सोबत आणू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी केले आहे.

# माजी सैनिक आणि माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना मालमत्ता करात १०० टक्के सूट मिळावी

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिक आणि माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना मालमत्ता करात १०० टक्के सूट मिळावी, अशी मागणी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, खारघर भाजपचे कार्यकर्ते किरण पाटील, कर्नल अमरजित सिंग वाधवान, कमांडर पुरणचंद चौधरी, शिवप्रसाद थपलियाल, गाजे सिंग, माजी सैनिक विजय जगताप आदी त्यांच्यासोबत उपस्थित होते.

माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या वेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारत देशाच्या संरक्षणाकरिता सैनिकांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची केले. त्याच धर्तीवर सैनिक सेवानिवृत्त झाल्यावर त्यांना आपल्या समाजात योग्य तो सन्मान मिळावा या हेतूने आपण प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून नेहमीच त्यांचा गुणगौरव करीत असतो, मात्र **(पान २ वर..)**

**या मागणीसंदर्भात शासनाकडे पत्रव्यवहार आणि पाठपुरावा करणार आहोत तसेच खारघर, पनवेल, कळंबोली, कामोठे आदी नोडनिहाय कॅम्प लावून संख्यात्मक माहिती घेणार आहोत.**
**-गणेश देशमुख, आयुक्त, पमपा**

## विविध गुन्ह्यांतील जप्त मुद्देमाल मालकांना सुपूर्द

### लोकप्रतिनिधी आणि पोलिसांची उपस्थिती



**पनवेल : वार्ताहर**


नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील विविध गुन्ह्यांत आरोपींकडून हस्तगत करण्यात आलेला पाच कोटी ४१ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल सोमवारी (दि. १४) आमदार गणेश नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार मंदा म्हात्रे, आमदार महेश बालदी आणि पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या उपस्थितीत मूळ मालकांना परत करण्यात आला.

जानेवारी २०२२ ते जुलै २०२३पर्यंत नवी मुंबई पोलिसांनी मालमत्तेविरोधातील गुन्ह्यांत आरोपींकडून हस्तगत केलेले दोन कोटी नऊ लाख २३ हजार ३८४ रुपये किमतीचे सोने व रोख रक्कम ७४ फिर्यादींना; तर तीन कोटी ३२ लाख चार हजार ९९ किमतीचा वाहन, मोबाईल व इतर मुद्देमाल १७४ फिर्यादींना अशा एकूण २४८ फिर्यादींना पाच कोटी ४१ लाख २७ हजार ६८३ रुपये किमतीचा मुद्देमाल परत करण्यात आला. या वेळी मुद्देमाल परत मिळालेल्या फिर्यादींपैकी काहींनी मनोगत व्यक्त करून आभार मानले.

वाशी येथील सिडको ऑडीटोरियम व एक्झिबिशन सेंटरमध्ये झालेल्या या कार्यक्रमास पोलीस सहआयुक्त संजय मोहिते, अपर आयुक्त दीपक साकोरे, उपायुक्त अमित काळे, विवेक पानसरे, पंकज डहाणे यांच्यासह पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.



**पनवेल : हर घर तिरंगा अभियानाच्या अनुषंगाने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या निवासस्थानी सन्मानपूर्वक तिरंगा ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत त्यांचे चिरंजीव अमोघ ठाकूर उपस्थित होते. या राष्ट्रीय उत्सवात तमाम नागरिकांनी सहभागी व्हावे आणि राष्ट्रध्वजाचा मान-सन्मान राखून आपापल्या घरावर तिरंगा ध्वज फडकवून स्वातंत्र्य दिन जल्लोषात साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.**



# मुंबई लोकलच्या प्रवाशांना दिलासा

## १२ डब्यांच्या ४९ गाड्या १५ डब्यांसह धावणार



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई लोकलने नियमित प्रवास करणाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाची बातमी आहे. स्वातंत्र्य दिनापासून अर्थात १५ ऑगस्टपासून १२ डब्यांच्या लोकल १५ डब्यांच्या करण्यात येणार आहेत. पश्चिम रेल्वेने याबाबत जाहीर केलेल्या माहती–नुसार ४९ लोकल १५ डब्यांच्या करण्यात येणार आहेत.

रेल्वे प्रवास सोयीचा आणि आरामशीर व्हावा याकरिता रेल्वे प्रशासन सातत्याने प्रयत्न करीत आहे तसेच प्रवासीवहन क्षमता वाढवण्याकडेही भर दिला जात आहे. पिक अवर्समध्ये चाकरमन्यांना लोकल ट्रेनच्या दारात लटकून प्रवास करावा लागतो. हा प्रकार टाळण्याकरता आणि एका ट्रेनमधून अधिकाधिक प्रवाशांना प्रवास करता यावा याकरता पश्चिम रेल्वेने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

१५ ऑगस्टपासून १२ डब्यांच्या लोकल १५ डब्यांच्या करण्यात येणार आहेत. त्यानुसार ४९ लोकल १५ डब्यांच्या करण्यात येणार आहेत. यासह पश्चिम मार्गाच्या मुंबई उपनगरी विभागात एकूण १५ डब्यांची रेल्वेची संख्या १५०वरून १९९पर्यंत वाढेल. वाढीव डब्यांच्या २५ लोकल डाऊन मार्गावर, तर २४ लोकल अप मार्गावरून धावणार आहेत. त्यानंतर २५ टक्क्यांनी प्रवाशांची क्षमता वाढणार आहे, अशी माहिती पश्चिम रेल्वेकडून देण्यात आली आहे.

मुंबई उपनगरी विभागातील लोकलमधून अधिकाधिक प्रवाशांना प्रवास करता यावा याकरता उत्तम रेल्वे सेवा प्रदान करण्याच्या उपक्रमाअंतर्गत पश्चिम रेल्वेने १२ डब्यांच्या ४९ लोकल ट्रेनचे १५ डब्यात रूपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे. हा बदल १५ ऑगस्टपासून प्रभावी होईल, असे पश्चिम रेल्वेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. हा बदल म्हणजे पश्चिम मार्गावरील रेल्वे प्रवाशांसाठी मोठे वरदान ठरेल, असेही या पत्रकात म्हटले आहे.

# हेल्मेट न घालणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई





**पनवेल : वार्ताहर**

दुचाकी वाहन चालविताना डोक्यावर हेल्मेट न घालणाऱ्या वाहन चालकांवर पोलीस उपायुक्त वाहतूक शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीखक संजय पाटील यांच्यासह वाहतूक पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे.

पनवेल परिसरातमध्ये हेल्मेट न घालणाऱ्या दुचाकीचालकांवर कारवाई करण्याची मोहीम सुरू केली आहे. या वेळी पोलिसांना दाखविण्यासाठी किंवा कारवाई पासून वाचण्यासाठी हेल्मेट न घालता आपल्या जीवासाठी हेल्मेट घाला, असे आवाहन संजय पाटील यांनी पनवेलकरांना केले आहे.

हेल्मेट सक्तीचा विषय सध्या राज्यातील महत्त्वाच्या शहरांमध्ये गाजत आहे. पनवेल शहारासह तालुक्यातही हेल्मेट घालणाऱ्यांचे प्रमाण कमी आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये वाहतूक नियम मोडणाऱ्यांच्या दिवसेंदिवस वाढ होऊ लागली आहे. दुचाकीस्वार हेल्मेटचा वापर करीत नाहीत. वाहन चालवत असताना फोनवर बोलण्याचे प्रमाणदेखील वाढ़त आहे तसेच मद्यपान करून वाहने चालविली जात आहेत. या बेशिस्त वाहतुकीमुळे अपघातात वाढ होऊ लागली आहे. यामुळे नवी मुंबईचे पोलीस आयुक्त यांनी बेशिस्तपणे वाहने चालविणाऱ्याविरोधात कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले.

### स्वतःच्या जीवासाठी हेल्मेट घाला!

*पनवेल परिसरातील महामार्ग, मुख्य चौकांमध्ये तसेच गजबजलेल्या ठिकाणी ही कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई सुरूच राहणार आहे, त्याचबरोबर कारवाईमुळे तरी नागरिकांमध्ये जागृती होईल व वाहन चालक हेल्मेट घालतील अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र पोलिसांना घाबरून किंवा कारवाई टाळण्यासाठी हेल्मेट न वापरता आपल्या स्वतःच्या जीवासाठी हेल्मेट घाला, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील यांनी केले आहे.*

# सीकेटी विद्यालयात देशभक्ती गीत गायन स्पर्धा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील पूर्वप्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमाच्या संकुलात स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्ती गीत गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती, भारत माता व सुभाष चंद्र बोस यांच्या प्रतिमेच्या पुजनाने झाली. रंग भरण स्पर्धा व वेशभूषा स्पर्धा तसेच आंतरशालेय स्पर्धेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देउन गौरविण्यात आले.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला देश स्वतंत्र झाला. देशाला स्वतंत्र करण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आणि क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांचे स्मरण करण्याचा हा दिवस. स्वातंत्र्यदिनी स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करून सर्व शैक्षणिक संस्था आणि कार्यालयांमध्ये ध्वजारोहण केले जाते. अनेक महान नेतृत्व लाभलेले आपले थोर मंडळी यांची जाणिव आणि त्यांनी केलेले बलिदान यातुन मिळणारी शिकवण हाच उद्देश ठेवून आयोजित केलेला हा कार्यक्रम, आजच्या पिढीला प्रेरणा देणारे व असे कार्यक्रम राबवून त्यांच्यात एक वेगळी कर्तव्यदक्षता आणि सामजिक जाणिव करून देणे हे उद्देश साधने आणि एक वेगळा विद्यार्थ्यानं मधील असलेल्या गुणांना संधी देवून त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचे काम या निमित्ताने साध्य केले.

वर्षा ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे व तिरंग्याच्या महत्त्व सांगितले. चांगू काना ठाकूर विद्यालयातील पूर्वप्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमात मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी पाहुण्यांचे शब्द सुमनांनी स्वागत केले व पर्यवेक्षिका वैशाली पारधी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी कार्यकारिणी सदस्य वर्षा ठाकूर, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, पर्यवेक्षिका अदुरी नीरजा, मराठी माध्यमिक विभागाचे सत्रे सर, मराठी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागाचग मुख्याध्यापक सुभाष मानकर, कनिष्ठ विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत मोरे, पालक शिक्षक उपाध्यक्ष श्री किशोर काजळे सर, पालक शिक्षक संघाच्या सदस्या मनीषा सोनवणे उपस्थित होते. चांगू काना ठाकूर विद्यालयातील पूर्वप्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमात स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## पावसाअभावी उकाड्यात वाढ

**मुंबई** : पावसाने विश्रांती घेतल्याने तापमानाचा पारा वर सरकत असून त्यामुळे उकाड्यात वाढ झाली आहे. त्यामुळे दिवसा बाहेर फिरताना घामाच्या धारा लागत आहेत. गेले अनेक दिवस पाऊस वरचेवर हजेरी लावत आहे. परिणामी उष्मा वाढत असून त्रास होत आहेत.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां.विभाग, पनवेल**
**पिनकोड - ४१० २०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
**दुरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स — ०२२-२७४६७४४०**
**ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ७२ (फेरनिविदा क्र.१) सन २०२३-२४**

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदाराला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www. mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण ८ काम समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १४.०८.२०२३ सकाळी १०.०० ते दिनांक २१.०८.२०२३ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई–निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड
दिनांक : १५/०८/२०२३

सही/–
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग
पनवेल

# विनायक मेटे यांच्या अपघातस्थळी श्रद्धांजली



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

वर्षभरापूर्वी मुंबई पुणे एक्सप्रेस वर भीषण अपघातात प्राण गमावणारत मराठा समाजाचे नेते, शिवसंग्रामचे अध्यक्ष कै. विनायक मेटे यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिना निमित्ताने अपघातस्थळी जावून श्रद्धांजली वाहण्यात आली.

१४ ऑगस्ट २०२२ रोजी पुन्हा होऊन मुंबईच्या दिशेने जाताना विनायक मेटे यांच्या गाडीला रसायनी पोलीस ठाणे हद्दीत भीषण अपघात घडला होता. या अपघातात विनायक मेटे यांचा उपचारा पूर्वी मृत्यू झाला होता.तर चालक बचावला होता. अंगरक्षक गंभीर जखमी झाला होता. विनायक मेटे यांचा अपघातनंतर मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावरील अपघाताचा प्रश्न ऐरणीवर आला होता. सोमवारी खालापूर सकल मराठा समाजाच्या वतीने स्मृति स्तंभ उभारण्यासाठी प्रयत्न सुरू असून प्राथमिक स्वरूपात शिला बसवण्यात आली. या वेळी मराठा समाजाचे नेते सुनील पाटील, शंकर थोरवे, उत्तम भोईर, सुरेश कडव, गोपाळ शेळके,दिलीप ठोंबरे, अनिलजी पिंगळे, अप्पा सतवे, भरत पाटील तसेच सकल मराठा बांधव उपस्थित होते.

# पिल्लई महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय युवा दिन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पिल्लई महाविद्यालय रसायनी आणि ग्रामीण रुग्णालय चौक आयसीटीसी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय युवा दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

या वेळी पिल्लई महाविद्यालयातील ६५ एन.एस.एस. व रेड रिबन क्लब विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित विद्यार्थ्यांना समुपदेशक अशोक लोंढे व विकास घुमरे यांनी या वर्षी आंतरराष्ट्रीय युवा दिनाची थीम ही युवकांनी हरित कौशल्य विकसित करून या विश्वात पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रयत्न करणे व विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त ज्ञानार्जन करणे यावर आधारित होती. याचबरोबर एच. आय. व्ही. एड्स विषयीची कारणे लक्षणे उपचार निरोधचे महत्त्व एच. आय. व्ही. एड्स मधील फरक व टी.वी. सोबत गुप्तरोग आजारांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य लता मेनन, रेड रिबन क्लबच्या प्रमुख प्रा. कलावती उपाध्ये वैद्यकीय अधीक्षक डॉ. सविता कालेल आयसीटीसीचे समुपदेशक अशोक भिमराव लोंढे आदी उपस्थित होते.

दरम्यान, स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व आंतरराष्ट्रीय युवा दिनानिमत्त माहिती देण्यात आली. एन.एस.एसच्या सर्व विद्यार्थ्यांना नशामुक्त भारत अभियानाची शपथ देउन राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही सदर संस्थेने इमारतीच्या पुर्नविकासाचा निर्णय घेतला असल्याने सदर संस्थेकडुन पुर्नविकसनाकरीता घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीमध्ये प्रत्येक सदनिकाधारकास मूळ क्षेत्राव्यतिरिक्त अधिकतम असे १० x १० चे क्षेत्र विकासकाने देण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

मिळकतीचे वर्णन
मौजे- पाली देवद, ता. पनवेल,जि.रायगड

| गाव | गट नं. | क्षेत्र (चौ.मी) | मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| पाली देवद | ४७ | ७०० चौ.मी | साई सागर को.ऑप हौ सो लि |


वरील वर्णन केलेली जमिन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करु व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक :-१४/०८/२०२३

सही/–
ॲड. भुषण मोरेश्वर म्हात्रे

पत्ता : ऑफीस नं. १४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजीमार्केट जवळ, पनवेल, जि. रायगड, मो. ९८९२२२२२५७

# माणगावमधील टीएमसी कॉलेजमध्ये युवा दिन उत्साहात साजरा





**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज येथे आंतरराष्ट्रीय युवा दिन शनिवारी (दि. १२) साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एच. व्ही. जोशी यांनी उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथील रेड रिबन क्लबचे समुपदेशक रंजना खेडेकर, आरती राजपूत, लॅब टेक्निशियन रोशन पालकर तसेच कळमकर व त्यांचे सहकारी यांचे स्वागत केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. चंद्रकांत माळी यांनी आंतरराष्ट्रीय युवा दिन का साजरा केला जातो त्याची सुरुवात केव्हापासून झाली याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर माणगाव उपजिल्हा रुग्णालयाच्या रंजना खेडेकर यांनी एच.आय.व्ही. एड्सची लागण कशामुळे होते, त्याची लक्षणे कोणती, लागण न होण्यासाठी काय खबरदारी आपण घेतली पाहिजे याविषयी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी महाविद्यालयातील एकूण ५२ विद्यार्थ्यांचे एचआयव्ही तपासणी, हिमोग्लोबिन, थायरॉईड तपासणी तसेच ब्लड सेल्स काउंटिंग इत्यादी तपासणी करण्यात आल्या. महाविद्यालयातील आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागाचे प्रमुख अमित बाकाडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाला जे.बी. सावंत एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी नानासाहेब सावंत, महाविद्यालयीन विकास समितीचे सदस्य रामदास पुराणिक यांचे मार्गदर्शन लाभले.

कॉलेजचे प्राध्यापक व कर्मचारी वृंद तसेच राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी स्वयंसेवक आणि डीएलएलइ विभागाचे स्वयंसेवक यांचे उत्तम सहकार्य लाभले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक शिवकुमार सिंग, प्रतीक दांडेकर, नीतीशा अधिकारी व सहकाऱ्यांन परिश्रम घेतले.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही सदर संस्थेने इमारतीच्या पुर्नविकासाचा निर्णय घेतला असल्याने सदर संस्थेकडुन पुर्नविकसनाकरीता घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीमध्ये प्रत्येक सदनिकाधारकास मूळ क्षेत्राव्यतिरिक्त अधिकतम असे १० x १० चे क्षेत्र विकासकाने देण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:-

मिळकतीचे वर्णन
मौजे- पाली देवद, ता. पनवेल,जि.रायगड

| गाव | गट नं. | क्षेत्र (चौ.मी) | मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| पाली देवद | ४७ | ७०० चौ.मी | साई सागर को.ऑप हौ सो लि |

वरील वर्णन केलेली जमिन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापुर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल करावी. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करु व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दिनांक :-१४/०८/२०२३

सही/–
ॲड. भुषण मोरेश्वर म्हात्रे

पत्ता : ऑफीस नं. १४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजीमार्केट जवळ, पनवेल, जि. रायगड, मो. ९८९२२२२२५७

पान १ वरुन

## स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्यांचे सदैव स्मरण केले पाहिजे

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली त्या स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांचा या वेळी सत्कार करण्यात आला. तुमच्या अडचणी सोडवण्यासाठी आम्ही सदैव तुमच्यासोबत आहोत, अशी ग्वाही आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिली.

या सोहळ्यास भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, रूचिता लोंढे, भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेल जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि देशप्रेमी नागरिक उपस्थित होते.

या वेळी कै. सदाशिव शांताराम ठाकूर, कै. शांतीलाल चुनिलाल गुगळे, कै. बाबूसिंग उर्फ प्रल्हादसिंग नारायणसिंग ठाकूर, कै. किसनराव एकनाथ जगनाडे, कै. परशुराम महादेव गोडबोले, कै. तुळशीराम बाळकृष्ण हिरवे, कै. शांताराम अच्युत वालावकर, कै. रामकृष्ण गणेश आपटे, कै. मारूती मुकुंद पन्हाळे, कै. मुळशंकर माधव मेहता, कै. शंकर चिंतामण तथा बापूसाहेब खरे, कै. दलिचंद लालचंद कोठारी, कै. दत्तात्रय वामन गोखले, हुतात्मा तुळशीराम बाळकृष्ण हिरवे, कै. दिगंबर गणेश गवाणकर यांच्या कुटुंबीयांचा आमदार प्रशांत ठाकूर व अन्य मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी शहरातील हुतात्मा स्मारक उद्यानात जाऊन अभिवादन केले.

## माजी सैनिक आणि माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना मालमत्ता करात १०० टक्के सूट मिळावी

काही माजी सैनिकांची आर्थिक परिस्थिती पाहता त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा वेळी माजी सैनिक व माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना राष्ट्र कर्तव्य पार पाडल्याबद्दल आपल्या पनवेल महापालिकेमार्फत आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता करात १०० टक्के सूट दिल्यास त्यांना मोठ्या प्रमाणात दिलासा मिळेल व यशस्वीरित्या राष्ट्र कर्तव्य पार पाडल्याने त्यांना खऱ्या अर्थाने सन्मान मिळेल.

या विषयाचे महत्त्व लक्षात घेता पनवेल महापालिका क्षेत्रातील माजी सैनिक व माजी सैनिकांच्या विधवा पत्नींना महापालिकेमार्फत आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता करात १०० टक्के सूट देण्याकरिता योग्य ती उपाययोजना करण्यात यावी, असे अधोरेखित करून माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी आग्रही मागणी केली आहे.

# पनवेल-माथेरान रस्त्याच्या पहिल्या टप्प्याला सुरुवात

## आदई सर्कल ते टावरवाडीपर्यंत काँक्रीटीकरणाचे काम

**खारघर : प्रतिनिधी**

राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नाने पनवेल-माथेरान रस्त्याच्या कामासाठी १३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिला आहे. त्यानुसार या रस्त्याच्या पहिल्या टप्प्याला (आदई सर्कल ते पुढे माथेरान मार्गावरील टावरवाडी) सुरुवात झाली आहे. हा मार्ग लवकरच खड्डेमुक्त होणार असल्याने नागरिकांनी दिलासा व्यक्त केला आहे.

आदई सर्कल ते सुकापूर गावासमोर चार किलोमीटरचा रस्ता काँक्रीटीकरण केले जाणार आहे. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या वतीने हे काम सुरू करण्यात आले आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून सूकापूर ग्रामपंचायत सरपंच योगिता राजेश पाटील व माजी जि. प. सदस्य अमित जाधव आदी भाजप पदाधिकाऱ्यांनी या रस्त्यासाठी सार्वजनिक बांधकाम



खात्याकडे पत्रव्यवहार केला होता.

पनवेल सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता मिलिंद कदम यांच्या प्रयत्नांने अर्थसंकल्पात तरतूद निधीमधून वेगवेगळ्या कामांना मंजूरी मिळाली. ठेकेदाराला वर्क ऑर्डर देवून शुक्रवारपासून सुकापूर येथील सहा किलोमिटरचा काँक्रीटीकरणचा पँचच्या कामाल सुरूवातदेखील झाली. यासाठी एक वर्षांची मुदत असेल. उरण, पनवेल, माथेरान भिमाशंकर राज्यमार्ग १०३ असे नाव असलेल्या रस्त्यापैकी आदईसर्कल ते सुकापुर येथील मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवेच्या पुलापर्यंतचा रस्ता संपुर्णपणे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे.

आदई सर्कल ते टावरवाडी या १९ किलोमीटरच्या मार्गांत नेरे गावाच्या पुढे आदिवासी भाग सुरू झाल्यानंतर हा रस्ता अधिक अरूंद होत जातो. त्यामुळे अरूंद रस्ता शक्य तिथे रूंद करण्यात येणार आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या रस्ता साडेपाच ते साडेसात फुटापर्यंत वाढविण्यात येणार आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यामुळे कामे तातडीने मंजूर होवून सुरू झाल्याचा विश्वास पीडब्लुडीच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

खड्डेमुक्त रस्ता तयार होत असल्याने राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण व आमदार प्रशांत ठाकूर, भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे सूकापूरच्या सरपंच योगिता पाटील, माजी जि. प. सदस्य अमित जाधव यांच्यासह अन्य भाजप पदाधिकाऱ्यांनी आभार मानले आहेत.

### दोन वर्षांत तीन नवे पूल

**माथेरानच्या पायथ्यापर्यंत जावून टावरवाडी येथे पोहचणारा रस्ता केवळ कॉक्रीटीकरण केले जाणार नाही तर चिपळे गावाजवळ गाढीनदीवर आठ कोटी खर्चून १२ मिटरचा पुल, वाजे आणि बापदेववाडी नवीन पुल प्रत्येकी अडीच लाख रूपये खर्चून नव्याने बांधण्यात येणार आहे. म्हणजेच एकूण १९ किलोमीटरच्या मार्गांत तीन नवे पुल पुढील दोन वर्षांत बांधण्यात येणार आहेत.**

# उरण येथे लवकरच सुरू होणार वरिष्ठ स्तर न्यायालय

**उरण : वार्ताहर, बातमीदार**



उरण न्यायालयात लवकरच वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन होणार असल्याचे उरण वकिल संघटनेचे अध्यक्ष अॅड. दत्तात्रेय नवाळे यांनी सांगितले.

उरण तालुक्यातील पाच लाख रुपये रकमेच्या वरील दिवाणी दाव्या मधील पक्षकार आणि त्यांचे वकिल यांना पनवेल येथे जाण्याकरिता होणारा त्रास वाचवण्याकरता उरण येथे वरिष्ठ न्यायालय स्थापन होणे गरजेचे झाले आहे. हे लक्षात घेऊन उरण न्यायालयाचे अध्यक्ष व त्यांचे कार्यकारिणीने उरण न्यायालयामधे वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापने करता कार्यकारीणीचे सभेमध्ये ठराव मंजीर करून हा ठराव जिल्हा न्यायालय अलिबाग यांच्या कडे पाठविला.

जिल्हा न्यायालय अलिबाग यांनी हा प्रस्ताव उरण न्यायालयाचे पनवेल येथील वरिष्ठ न्यायालयामध्ये चालणाऱ्या सर्व दिवाणी अर्जाची व दाव्याची माहिती मागवून उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे मंजुरी करता पाठविला आहे. उरण येथे वरिष्ठ स्तर न्यायालय स्थापन करण्याकरता लागणारी दाव्याची संख्या पुरेशी असल्यामुळे नियमाप्रमाणे मुंबई उच्च न्यायालय ही बाब मंजूर करण्याची अपेक्षा आहे.

याकरिता उरण न्यायालयाच्या वकिल संघटनेचे अध्यक्ष अॅड. दत्तात्रेय नवाळे, उपाध्यक्ष अॅड. भारती भोईर, उपाध्यक्ष अॅड. किशोर ठाकुर, अॅड. प्रसाद पाटील, सचिव अॅड. अर्चना माळी, अॅड. प्रतिभा भालेराव, उपसचिव अॅड. संतोष पाटील, लेखापरीक्षक तसेच अॅड. अझीमीन अन्सारी, अॅड. वृषाली पाटील, अॅड. विपुल ठाकुर, अॅड. धिरज डाकी सर्व सदस्य तसेच वरिष्ठ वकिल अँड एम. एम. मोकल, अॅड. मोहन थळी, अॅड. भानुशाली वगैरे वकिलांनी मोलाचे सहकार्य केले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फ्रेशर्स पार्टी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. १२) प्रथम वर्ष बीएमएस, बॅफ, बी.कॉम, बीएस्सी, बीएस्सीआयटी व बीएस्सीसीएसच्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी सांस्कृतिक विभागातर्फे फ्रेशर्स पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून सर्व शाखेतील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना त्यांचे कलागुण सादरीकरण करण्यासाठी संधी देण्यात आली. सुरुवातीला द्वितीय व तृतीय वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी विविध कलागुण सादर केले.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी जबाबदारीचे भान ठेऊन भविष्याची वाटचाल करावी याबाबत मार्गदर्शन केले व सर्व प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रेशर्स पार्टीचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केले तसेच सांस्कृतिक विभागातील सर्व सदस्य व सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद शिक्षकेत कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.






## संपादकीय

# कायद्यांचे भारतीयीकरण

शुक्रवारी म्हणजे ११ ऑगस्ट रोजी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतीय दंड संहिता (आयपीसी), फौजदारी प्रक्रिया संहिता (सीआरपीसी) आणि भारतीय पुरावा कायदा (एविडेन्स ॲक्ट) या कायद्यांची जागा घेणारी तीन विधेयके लोकसभेत सादर केली. या नव्या कायद्यांमधून अनेक स्वागतार्ह बदल घडून येणार असून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी काळात अखेर फौजदारी कायद्यांचे भारतीयीकरण होणार आहे.

**आजवर म्हणजे अगदी १८६० पासून २०२३ पर्यंत या देशाची फौजदारी न्यायव्यवस्था इंग्रजांनी बनवलेल्या कायद्यांच्या आधारे चालत राहिली आहे. त्यांच्या जागी आता भारतीय आत्मा असलेले तीन कायदे स्थापन केले जातील आणि त्याद्वारे आपल्या फौजदारी न्यायव्यवस्थेत मोठे बदल घडून येतील असे उद्गार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ही विधेयके मांडताना शुक्रवारी लोकसभेत काढले होते. हे तिन्ही कायदे भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश संसदेत मंजूर केले गेले होते आणि त्यानंतर येथे लागू करण्यात आले. त्याअर्थाने हे तिन्ही ब्रिटिशकालीन कायदे गुलामगिरीचे प्रतीक असून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी काळात अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भारतीय जनता पक्षाच्या सरकारकडून या फौजदारी कायद्यांचे भारतीयीकरण होणार आहे. अर्थातच हे अतिशय महत्त्वाचे कायदे असल्यामुळे त्यांच्यात बदल केले जाण्यापूर्वी त्यावर सखोल चर्चा आवश्यक असल्यामुळेच स्वत: अमित शाह यांनीच ही विधेयके फेरपडताळणीकरिता संसदीय स्थायी समितीकडे पाठवण्याची सूचना केली हे ध्यानात घेतले पाहिजे. वसाहतवादाचा वारसा असलेल्या या तीन कायद्यांमध्ये काळानुरूप बदल करण्याची ही प्रक्रिया मे २०२० मध्येच सुरू झाली असून केंद्रीय गृहमंत्रालयाने या तीन कायद्यांमध्ये बदल सुचवण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. निवृत्त न्यायाधीश, ज्येष्ठ अनुभवी वकील तसेच निवृत्त सनदी अधिकारी अशा देशभरातील अनेक मान्यवरांकडून आलेल्या सूचनांचाही या समितीने विचार केला. आता यापुढे ही विधेयके संसदीय समितीसमोर चर्चिली जातील. तिथे विरोधी पक्षांनाही त्यावर आपले मत मांडण्याची संधी मिळेल. त्यानंतर ही विधेयके विधि आयोगाकडेही पाठवली जाणार असून या अत्यंत महत्त्वाच्या अशा प्रक्रियेनंतरच ही विधेयके पुन्हा संसदेसमोर येतील. तिथे त्यांच्यावर पुन्हा चर्चा होईल आणि त्यानंतरच ती मंजूर केली जातील याची नोंद घेण्याची गरज आहे. स्वतंत्र, सार्वभौम भारत देशात सर्व सुयोग्य प्रक्रिया सुविहितपणे पार पाडूनच या तीन महत्त्वाच्या विधेयकांमध्ये काळानुरूप बदल केले जातील. नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये निवडणूक प्रचारादरम्यान म्हणजे पंतप्रधानपदी येण्याआधीच या बदलांचे सूतोवाच केले होते. सुमारे १६० वर्षे जुन्या, वसाहतकालीन आणि कालबाह्य अशा या कायद्यांमध्ये बदल घडवून आणण्याचे आश्वासन त्यांनी तेव्हाच दिले होते. त्याची पूर्तता होण्याच्या प्रक्रियेचा अखेरचा टप्पा आता सुरू झाला आहे असे म्हणायला हरकत नाही. सरकारचा उद्देश शिक्षा देणे हा नसून न्याय देणे हाच असणार आहे, असेही अमित शाह यांनी या विधेयकांतील बदलांबद्दल बोलताना स्पष्ट केले आहे. आपल्या न्यायव्यवस्थेवर सर्वाधिक टीका होते ती कायदेशीर प्रक्रियेला लागणाऱ्या प्रदीर्घ कालावधीबद्दल. ही प्रक्रिया जलद करण्याचा प्रयत्न या बदलांतून अर्थातच केला जाणार आहे, जेणेकरून रखडलेल्या प्रकरणांची संख्या कमी होईल. विधेयकांचा अंतिम मसुदा समोर आल्यानंतरच या बदलांचा सध्याच्या न्यायव्यवस्थेवर काय नेमका परिणाम दिसून येईल ते स्पष्ट होऊ शकेल.**

# घातक रासायनिक पाण्याने ‘सावित्री’ प्रदूषित



## खबरबात

महेश शिंदे

गेली अनेक वर्ष महाड आद्यौगिक क्षेत्रातून दासगाव सावित्री खाडी प्रदूषित करण्याचे उद्योग अद्याप थांबले नसून गेली पंधरा दिवसांपासून सावित्री खाडी मोठ्या प्रमाणात रासायनिक सांडपाण्यामुळे प्रदूषित झाली असून खाडी लागत असणाऱ्या गावांना प्रदुषणाचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे गुरांच्या पाण्याचा प्रश्न, कपडे धुण्याचा प्रश्न शेती प्रश्न आणि मच्छिमारी प्रश्न ऐरणीवर आले आहेत. खाडी लगत असणाऱ्या दासगाव ग्रामस्थांमध्ये संतापाची भावना असुन रत्नागिरी जिल्ह्यात दाभोळ खाडीमध्ये ज्या प्रमाणे भोई समाजाला अनुदान दिले जाते त्याप्रमाणे या ठिकाणी अनुदानाची मागणी भोई समाजाकडून केली जात आहे.

महाड आद्यौगिक क्षेत्राच्या निर्मितीला आज जवळपास ३५ वर्षे झाली आहेत. या क्षेत्रातून निघणारे दूषित सांडपाणी हे या सावित्री नदी पासून तालुक्यातील १५ कीमी अंतर असलेल्या ओवळे या गाव हद्दीत सोडले जाते. हे पाणी सोडले जात असताना यावर सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रामध्ये प्रक्रिया करून ओवळे या गाव हद्दीत खाडीत पाईपलाईनद्वारे हे दुषित पाणी सोडले जाते. दरवर्षी अनेक कारखानदार पावसाचा फायदा घेत सरळ सरळ दूषित पाणी गटारात सोडून देत असतात हे पाणी गटार द्वारे थेट सावित्री खाडीला मिळते. गेली पंधरा दिवसांपासून मोठ्या प्रमाणात दासगाव सावित्री खाडी प्रदूषित झाल्याचे दिसून येत आहे. हा प्रकार कोणत्या कारखान्याने केला आहे, मात्र अद्याप समजू शकलेले नसले, तरी याचा त्रास खाडी लागत असलेल्या गावांना होत आहे.

पावसाळ्यात सावित्री खाडीचे जवळपास पाच महिने पाणी गोड राहते यात खाडीच्या पाण्याचा प्रादुर्भाव होत नाही. त्यामुळे लागत असलेली दासगाव तसेच इतर गाव या पाण्याचा वापर गुरांना पाणी पिण्यासाठी, कपडे धुण्यासाठी, व इतर कामांसाठी करत असतात. त्याचबरोबर पावसाळी मच्छिमारीदेखील मोठ्या प्रमाणात केली जाते. सध्या गेली १५ दिवसांपासून या सावित्री खाडीमध्ये मोठ्या प्रमाणात रासायनिक दूषित पाणी येत असल्याने या खाडीच्या पाण्याचा वापर बंद करण्यात आला आहे. सावित्री नदीच्या या प्रदुषणामुळे दासगावकर ग्रामस्थ चांगलेच संतापले असून आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

नागरिकांच्या म्हणण्याप्रमाणे सध्या होणारे खाडी प्रदूषण हे तालुक्यातील ओवळे गाव या ठिकाणी आद्यौगिक क्षेत्रातुन पाईपलाईनद्वारे येत असलेल्या रासायनिक पाण्यापासून होत आहेत. त्या ठिकाणी येणारे पाणी हे वेगळ्या रंगाचे आहे. या पाण्याला फेस आला आहे. तसेच पाण्याला मोठ्या प्रमाणात दुर्गंधी आहे. हेच पाणी येणाऱ्या भरती सोबत सोबत महाड पर्यंत येत असून संपूर्ण १५ किमी खाडी या पाण्याने दूषित झाली आहे, असे आरोप या परिसरातील अनेक नागरिकांकडून केले जात आहेत, मात्र सीईटी पी चेरमण अशोक तलाठी यांनी हे आरोप चुकीचे असून सांड पाणी प्रक्रिया केंद्रातून येणारे पाणी हे पूर्णपणे ट्रेटमेंट करूनच सोडले जात आहे.

काही कारखानदार गटारांद्वारे आणि टँकरद्वारे खाडीत दूषित पाणी सोडत असल्याचा संवश व्यक्त तलाठी यांनी केला आहे. नागरिकांच्या तक्रारीनुसार सावित्री खाडीतील पाण्याचे तपासणी साठी नमुने घेण्यात आले आहेत. काही कुटुंबाचा उदरनिर्वाह मच्छिमारीवर आहे. गेली १५ दिवस खाडीमध्ये केमिकलचे पाणी येत आहे मच्छिमारी बंद झाल्यामुळे उदरनिर्वाहाचा सादन बंद झाले आहे. असाध्य संपूर्ण खाडी प्रदूषित आहे. याला सामाईक सांड पाणी प्रक्रिया जबाबदार आहे. कारण पावसाळ्यात कारखान्यातून येणारे दूषित पाणी यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते पाणी सरळ खाडीत सोडले जाते. या पाण्यामुळे मासेमारी आणि खाडी लगत असलेला शेती व्यवसाय पूर्ण पणे नष्ट झाला आहे. ज्याप्रमाणे रत्नागिरी जिल्ह्यात दाभोळ खाडी मध्ये भोई समाजाला अनुदान दिले जाते त्याप्रमाणे या ठिकाणी देण्यात यावे. तसेच नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या सामाईक सांडपाणी प्रक्रिया अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी होत आहे.

# छत्रपती शिवरायांचा जीवनपट माहीत असायलाच हवा!

सोनी मराठी वाहिनीच्या कोण बनणार करोडपती या मराठी कार्यक्रमाच्या चौथ्या पर्वातील ६२ वा भाग नुकताच पाहण्यात आला. या भागात अभिनेता सचिन खेडेकर यांच्यासमोर हॉटसीटवर नगर जिल्ह्यातील माध्यमिक शाळेच्या एक शिक्षिका बसल्या होत्या. पहिल्या ४ प्रश्नांची अचूक उत्तरे दिल्यानंतर खेडेकर यांनी त्यांना १० सहस्त्र रुपयांसाठी पाचवा प्रश्न विचारला 'छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा कोणत्या किल्ल्यावर झाला?' या प्रश्नाच्या उत्तरासाठी त्यांना प्रतापगड, शिवनेरी, सिंहगड आणि रायगड असे ४ पर्याय देण्यात आले होते. हुद्द्याने गणित विषयाच्या शिक्षिका इतिहासातील एका प्रश्नाने गोंधळून गेल्या आणि त्यांनी या प्रश्नाच्या उत्तरासाठी 'व्हिडीओ कॉल'च्या 'लाईफलाईन'चे साहाय्य घेण्याचा निर्णय घेतला.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या शिक्षिकेने विज्ञान शाखेत पदव्युत्तर शिक्षण घेऊन शिक्षिक विषयाची पदवी घेतली आहे. असे असताना शैक्षणिक अभ्यासक्रमातील एका साध्या प्रश्नाने त्यांच्या मनात संभ्रम निर्माण झाला. हा इतिहास केवळ परीक्षेतील प्रश्नांची उत्तरे लिहिण्याकरिता शिकवला जातो का, असा प्रश्न आता यानिमित्ताने निर्माण झाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामुळेच या महाराष्ट्रातील देवालयांत देव शाबूत आहेत, त्यामुळे ते या महारष्ट्रातील नागरिकांना देवाहून कमी नाहीत. अशा या महापुरुषांचा प्रेरणादायी जीवनपट महाराष्ट्रातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना ज्ञात असणे आवश्यकच आहे. पाठ्यपुस्तकातील अभ्यासक्रमानुसार मुलांना शिकवणे एव्हढेच शिक्षकांचे काम नसून देशाच्या भावी पिढीमध्ये संस्कारक्षम आणि आदर्श नागरिक घडवण्याचे दायित्वही त्यांचेच असते. त्यासाठी या मातीतील पराक्रमी महापुरुषांचा इतिहास विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर बिंबवला गेला पाहिजे. शाळेत शिकवणाऱ्या उच्चशिक्षित शिक्षकांचाच इतिहास असा कच्चा असेल, तर मुलांवर पराक्रमी इतिहासाचे संस्कार होणार तरी कसे?

आज आपण स्वातंत्र्यात मुक्तपणे जगत आहोत, सुख सुविधांचा, सरकारी योजनांचा लाभ घेत आहोत, लोकशाहीने आपल्याला अनेक अधिकार दिले आहेत. हे सर्व आपल्याला सहजपणे मिळालेले नाही, त्यासाठी आपल्या पूर्वजांनी अनेक जुलमी राजवटींच्या विरोधात महत्पराक्रम गाजवला आहे, त्यांच्या या पराक्रमाविषयी आणि त्यागाविषयी सातत्याने कृतज्ञ राहायला हवे. छत्रपती शिवरायांविषयी कवी भूषण म्हणतो 'काशी की कला जाती, मथुरा मे मस्जिद बसती अगर शिवाजी ना होते, तो सुन्नत सबकी होती' छत्रपती शिवरायांची महती वर्णन करण्यासाठी केवळ ही एक ओळच पुरेशी आहे. असा हा महापुरुष महाराष्ट्राच्या मातीला लाभला हेच या भूमीचे भाग्य आहे त्यामुळे त्यांचा जीवनपट अभ्यासणे, त्यांचे आदर्श कृतीत आणणे आणि शिवरायांचा इतिहास पुढच्या पिढीला शिकवणे हे आपले कर्तव्यच आहे!

**–जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## बदलते तंत्रज्ञान



# तुटलेल्या स्क्रीनचा फोन वापरणे ठरू शकते घातक



कितीही चांगला स्मार्टफोन असला, तरीही तो खाली पडल्यानंतर डिस्प्लेला तडे जातातच. कित्येक लोक असेच क्रॅक असलेले किंवा तुटक्या डिस्प्लेचे स्मार्टफोन वापरत असतात. सध्या काम चालवू, आणि नंतर आणखी खराब झाल्यावर एकदमच बदलू असा विचार हे लोक करतात.

तुम्हीदेखील असाच विचार करुन तुटलेल्या स्क्रीनचा फोन वापरत असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. असे करणे तुमच्या स्मार्टफोनसाठी आणि तुमच्याही आरोग्यासाठी घातक ठरू शकते. यामुळे तुटलेला डिस्प्ले लवकरात लवकर बदलून घेणेच तुमच्या फायद्याचे ठरते.

**टच रिस्पॉन्स** : स्मार्टफोनचा डिस्प्ले क्रॅक झाल्यानंतर त्यावर काम करणे अवघड जाते. आजचे स्मार्टफोन हे संपूर्णपणे स्क्रीन–टच असतात. त्यामुळे स्क्रीनच ठीक नसेल तर स्मार्टफोन वापरणंच शक्य होत नाही. तसंच खराब डिस्प्ले तसाच वापरत राहिल्यास तो आणखी खराब होण्याची शक्यता असते. याचा मोबाईलच्या टचपॅडवरही परिणाम होतो.

**फोनमध्ये जाऊ शकते धूळ** : तुटलेल्या स्क्रीनचा फोन वापरण्याचा एक मोठा धोका म्हणजे मोबाईलमध्ये धूळ जाणे. स्क्रीनच्या तुटलेल्या भागातून धुळीचे अगदी छोटे कण फोनच्या आत जाऊ शकतात. डोळ्यांना न दिसणाऱ्या या कणांमुळे मोबाईलचे मोठे नुकसान होऊ शकते.

**डोळ्यांना धोका** : आपल्या स्मार्टफोनमधून निघणारी ब्लू–लाईट ही आपल्या डोळ्यांसाठी घातक असते. फोनवर असणारा डिस्प्ले या लाईटचा धोका कमी करण्याचे काम करतो. यासाठी त्यावर प्रोटेक्शन लेअर दिलेली असते, मात्र डिस्प्ले तुटल्यामुळे ही लाईट थेट तुमच्या डोळ्यात जाऊ शकते, ज्याचा विपरित परिणाम तुमच्या डोळ्यांच्या आरोग्यावर होऊ शकतो.

# भारतीय स्वातंत्र्याचा वर्धापन दिन



## निमित्त

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला इंग्रजांच्या तावडीतून स्वातंत्र्य मिळाले. याच दिवशी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा १९४७ च्या तरतुदी लागू होऊन भारतीय संविधान सभेला वैधानिक सार्वभौमत्व प्राप्त झाले होते. मोठ्या प्रमाणावर अहिंसक आंदोलने आणि सविनय कायदेभंगासाठी प्रख्यात झालेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीनंतर देशाला स्वातंत्र्य मिळाले होते.

स्वातंत्र्यानंतर धार्मिक आधारावर भारताची फाळणी झाली, ज्यामध्ये भारत आणि पाकिस्तानमध्ये विभागला गेला. फाळणीनंतर हिंसक दंगली झाल्या, तसेच मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली. धार्मिक हिंसाचारामुळे जवळपास १.५ कोटी लोकांनी स्थलांतर केले. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी राजधानी दिल्ली येथील लाल किल्ल्याच्या लाहोरी गेटवर राष्ट्रध्वज फडकावला. त्यानंतरच्या प्रत्येक स्वातंत्र्यदिनी विद्यमान पंतप्रधान परंपरेने लाल किल्ल्यावर ध्वज फडकावतात आणि राष्ट्राला संबोधित करतात. इ. स. १७७० पासून भारतावर इंग्रजांचे राज्य होते. १९व्या शतकापासूनच सर्व राज्यांना इंग्रजांनी आपल्या सैन्यबळावर ताब्यात ठेवले होते. १८५७च्या स्वातंत्र्य समरानंतर ब्रिटिशांनी त्यांची व्यवस्था अजूनच शिस्तीची केली. १८८५ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली.

दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिशांना लक्षात आले की, आपल्याला भारतावरचे राज्य व युद्ध हे सांभाळता येणार नाही आहे, तसेच दुसऱ्या बाजूला भारतीय क्रांतिकारकांचा जोर वाढत होता. ही गोष्ट कळल्यानंतर ब्रिटनच्या पंतप्रधानांनी जून १९४७ पर्यंत भारत पूर्णपणे स्वतंत्र करण्याची हमी दिली. अखेर १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. पण त्यावेळी भारताचे पाकिस्तान आणि भारत असे दोन तुकडेही पडले. पाकिस्तानी भागात राहणाऱ्या अनेक पंजाब्यांना व सिंधीना त्यांचे घरदार, पैसा सोडून यावे लागले. अनेक लोक ह्यामध्ये मारलेही गेले. पुढे ह्या विभाजनामुळे काश्मीरचा प्रश्नही पुढे आला.

स्वतंत्र भारत २६ जानेवारी १९५० रोजी प्रजासत्ताक झाला. भारताची राज्यघटना तयार करण्यात बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा मोलाचा वाटा होता. प्रजासत्ताक भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू व पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद होते. रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेले जन गण मन हे भारताचे राष्ट्रगीत तर बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी लिहिलेले वंदे मातरम् हे राष्ट्रीय गीत म्हणून ठरवले गेले. स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला, भारताचे राष्ट्रपती राष्ट्राला संबोधित करतात. १५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान हे दिल्लीतील लाल किल्ल्याच्या ऐतिहासिक स्थळाच्या तटबंदीवर भारतीय ध्वज फडकावतात. जन गण मन हे भारतीय राष्ट्रगीत गायले जाते. भाषणानंतर भारतीय सशस्त्र दल आणि निमलष्करी दलाच्या तुकड्यांचा मार्च पास्ट होतो. परेड आणि स्पर्धांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील देखावे आणि भारताच्या विविध सांस्कृतिक परंपरांचे दर्शन घडते. अशाच घटना राज्यांच्या राजधानीत घडतात जेथे वैयक्तिक राज्यांचे मुख्यमंत्री राष्ट्रध्वज फडकवतात, त्यानंतर परेड आणि स्पर्धा होतात. १९७३पर्यंत राज्याचे राज्यपाल राज्याच्या राजधानीत राष्ट्रध्वज फडकावत असत. फेब्रुवारी १९७४मध्ये, तामिळनाडूचे मुख्यमंत्री, एम. करुणानिधी यांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्याकडे हा मुद्दा उचलून धरला की पंतप्रधानांप्रमाणेच मुख्यमंत्र्यांनाही स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वज फडकावण्याची परवानगी देण्यात यावी. १९७४ पासून संबंधित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना स्वातंत्र्यदिनी राष्ट्रध्वज फडकावण्याची परवानगी आहे.

**(साभार : इंटरनेट)**

## क्लिक...क्लिक...!



**पनवेल : शहरी भागात राहणाऱ्या नागरिकांना शेतीचे महत्त्व कळावे व त्यांना शेती अनुभवता यावी या उद्देशाने एक दिवस आपल्या कष्टकरी राजासाठी या उपक्रमाचे आयोजन वारदोली गावात करण्यात आले होते. प्रत्यक्ष शेतामध्ये जाऊन शेतीकामांचा अनुभव पनवेलच्या मिडलक्लास हौसिंग सोसायटीतील नागरिकांनी घेतला.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

## आरोग्य प्रहर

# वेळीच ओळखा किडनीचा आजार; ही आहेत लक्षणे



किडनी हा आपल्या शरीराचा एक महत्त्वाचा अवयव आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची समस्या असेल तर आपण आजारी पडू शकतो, तसेच किडनीत वेदना होऊ शकतात. अनेकदा किडनी निकामी झाल्यामुळे मशिनद्वारे डायलिसिस करावे लागते, तरच विषारी पदार्थ शरीराबाहेर पडू शकतात. किडनीच्या आजाराची मोठी समस्या म्हणजे हा आजार खूप उशीरा ओळखला जातो. मात्र, काही महत्त्वाच्या लक्षणांद्वारे किडनीच्या आजाराचा धोका वेळीच ओळखता येतो.

**किडनीच्या आजाराची लक्षणे**

लघवीच्या रंगात बदल: किडनीच्या कार्यात थोडीशी अडचण आली तर त्याचा परिणाम लघवीच्या रंगात स्पष्टपणे दिसून येतो. यामध्ये लघवीचा रंग गडद पिवळा, लघवीत फोम, वारंवार लघवी होणे असा त्रास होतो. अशावेळी ताबडतोब लघवीची तपासणी करून घ्या.

**थकवा:** जेव्हा किडनीची समस्या उद्भवते तेव्हा शरीरात लोह आणि अनेक प्रकारच्या पोषक तत्वांची कमतरता असते. त्याचबरोबर लाल रक्तपेशीही तयार होणे कमी होते. लाल पेशी रक्तातील ऑक्सिजनची पातळी टिकवून ठेवतात. हेच कारण आहे की आरबीसीच्या कमतरतेमुळे आपल्याला थकव्याला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे थकवा जाणवतोय का याकडे लक्ष असुद्या.

**तोंडातून दुर्गंध येणे:** तोंडाची आणि दातांची स्वच्छता न करणे, कांदा–लसूण खाणे अशी अनेक कारणे तोंडाच्या दुर्गंधीमागे असू शकतात. पण यातलं काहीच तुम्ही करत नसाल तर तुम्हाला सावध राहण्याची गरज आहे. ही किडनीच्या आजाराची सुरुवातीची लक्षणे असू शकतात.

**त्वचारोग:** किडनीचे कार्य व्यवस्थित न झाल्याने शरीरात घाण जमा होऊ लागते. ज्याचा परिणाम आपल्या त्वचेवरही स्पष्टपणे दिसून येतो. अशावेळी इन्फेक्शनचा धोका वाढतो, तसेच शरीरावर आणि चेहऱ्यावर पुरळ दिसू लागतात.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# कर्जतच्या बेकरेत अवैध हातभट्टी उद्ध्वस्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई ; तीन लाखांचा मुद्देमाल नष्ट

**नेरळ : प्रतिनिधी**

बेकरे गावात अवैध हात भट्टी गावठी दारूवर राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून धडक कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये तीन लाख १० हजार रुपये किमतीची रसायन मिश्रीत दारू व लागणारे साहित्य पोलीस विभागाकडून नष्ट करण्यात आले असून सहा जणांवर गुन्हेदेखील दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाई मुळे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.





शनिवारी (दि. १२) राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त विजयकुमार सूर्यवंशी यांच्या सूचनेनुसार कर्जत तालुक्यातील बेकरे गावात अवैध हात भट्टीची गावठी दारू तयार होत असल्याची माहिती मिळाली होती. यामुळे रायगड अलिबाग येथील राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक रविकिरण कोले यांच्या उपस्थितीत मार्गदर्शनाखाली निरीक्षक पनवेल उत्तम आव्हाड व ग्रामीण पोलीस भरारी पथक दोन तयार करण्यात आले होते.

दरम्यान, या भरारी पथकाने बेकरे गावात अचानक धाड टाकून जंगल परिसरात तयार करण्यात येत असलेली गावठी हात भट्टी दारू व दारू तयार करण्यासाठी लागणारे, गुळ, नवसागर मिश्रीत रसायन त्याच प्रमाणे लोखंडी ड्रम, प्लॅस्टिक ड्रम–कॅन, बॉयलर साहित्य असे ऐकून तीन लाख दहा हजार किमतीचे माल सापडून आल्याने तो जागेवरच नष्ट करण्यात आला. या वेळी सहा जणांवर महाराष्ट्र दारूबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

# बोर्झे ग्रामपंचायत सरपंचपदी भाजपच्या सुषमा पाटील बिनविरोध



**पेण : प्रतिनिधी**

आमदार रविशेठ पाटील व भाजप जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वाशी विभागातील बोर्झे ग्रामपंचायत वर भाजपचा झेंडा फडकला आहे.

बोर्झे माजी सरपंच मालती मदन ठाकूर यांनी राजीनामा दिल्यानंतर बोर्झे ग्रामपंचायतचे सरपंच पद रिक्त झाले होते. शासनाच्या नियोजनानुसार हे पद भरण्यासाठी सोमवारी (दि. १४) बोर्झे ग्रामपंचायतमध्ये निवडणूक कार्यक्रम झाला. ह्या निवडणुकीत भाजपच्या सुषमा निलेश पाटील यांच्याविरोधात कोणीही फॉर्म भरला नसल्याने निवडणूक अधिकारी यांनी सरपंचपद बिनविरोध म्हणून सुषमा निलेश पाटील यांच्या नावाची घोषणा केली आणि एकच जल्लोष साजरा करण्यात आला.

या वेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, माजी राजिप सदस्य प्रभाकर म्हात्रे (हरिओम शेठ), भाजप जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, दिव ग्रामपंचायतचे माजी सरपंच विवेक म्हात्रे, उपसरपंच विजय ठाकूर, संभाजी पाटील, सुप्रिया पाटील, विजया ठाकूर, मयुरी ठाकूर, मंगल ठाकूर, करावी माजी सदस्य चंद्रकांत पाटील, वाशी ग्रामपंचायत सरपंच गोरख पाटील, तालुका सरचिटणीस सचिन पाटील, कळवा माजी सरपंच कमलाकर मोकल, भगवान मोकल, बेनवले सदस्य परशुराम पाटील उपस्थित होते.

# नेरळमधील महिलेला पतीकडून मारहाण

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ गावातील खांडा भागातील हनुमान मंदिर परिसरात राहणाऱ्या कुटुंबातील विवाहित महिलेला प्रचंड मारहाण करण्याची घटना घडली होती. घरातून नेरळ स्टेशनपर्यंत मारहाण करण्याची घडली असून महिला डोंबिवली येथे आपल्या माहेरी पोहचली आणि नंतर तेथील पालिका रुग्णालयात सध्या उपचार घेत आहेत.

नेरळ पोलिसांकडे डोंबिवली विष्णुनगर पोलीस ठाणे यांनी गुन्हा वर्ग केल्यानंतर नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला असून पत्नीला जबर मारहाण झाल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर एकच खळबळ माजली आहे. खांडा भागातील हनुमान मंदिर येथे एक कुटुंब राहते. त्या कुटुंबातील महिलेला तिचा पती दारूच्या नशेत सतत अपशब्द वापरायचा. तसेच घरातील घरात पाळीव प्राण्यांची विष्टा साफ करण्यासाठी वारंवार त्रास दिला जात होता. आपल्या आईबद्दल अपशब्द बोलू नका असे बोलुन विरोध केला होता. त्या गोष्टीचा राग नवऱ्यास आला आणि त्याने तिला शिवीगाळ करत कंबरेच्या चामडीपट्ट्याने बेदम मारहाण केली. डोळयावर मारहाण करून दुखापत केली. तसेच तिला उचलून फेकूनही दिले. त्यामुळे तिला गंभीर दुखापत झाली. त्याने घरातील लहान मुलांनादेखील मारहाण केली. नवऱ्याच्या तावडीतून सुटका करून ती विवाहित महिला घराबाहेरील रस्त्याने नेरळ रेल्वे स्टेशनकडे पळून जात असताना त्यांच्या मागे धावत जावून देखील मारहाण केली.

घटनेनंतर नेरळ येथे मुंबई कडे जाणारी लोकल पकडून आपला जीव वाचवण्यात यश मिळविले. मुंबईकडे जाणाऱ्या लोकल मध्ये जखमी अवस्थेत असलेल्या या महिलेला काही प्रवाशांनी विचारपूस करून व्हिडिओ केला आणि समाज माध्यमांवर पाठवला गेला. माहेरी डोंबिवली येथे शास्त्रीनगर भागातील पालिका रूग्णालयात दाखल झाल्या. त्यांच्यावर तेथे उपचार सुरू असून तेथील विष्णुनगर पोलीस ठाणे यांच्याकडून त्याबाबत तक्रार नोंद करण्यात आली होती. ती तक्रार विष्णुनगर पोलीस ठाणे येथून हा गुन्हा नेरळ पोलीस ठाणे येथे वर्ग झाला आहे.

# विळे गावातील बिअर शॉप फोडले

## दोन लाख रुपये घेऊन चोरटे पसार

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील विळे गावातील गावठाण बाजारपेठ येथील बंद बिअर शॉपी व देशी दारूचे दुकान फोडून अज्ञात चोरटा दोन लाख रुपये घेऊन पसार झाला आहे. या घटनेची फिर्याद महेश मनोहर राजिवडे (वय ४०, रा. विळे गावठाण, माणगाव) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

गुन्ह्याबाबत माणगाव पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी कि, गुन्ह्याची फिर्याद देणारे महेश मनोहर राजिवडे यांचे विळे गावठाण बाजारपेठ येथील बंद बिअर शॉपी व देशी दारूच्या दुकानातील पूर्व बाजूकडील भिंतीला असलेला लोखंडी ग्रील अज्ञात चोरट्याने कोणत्यातरी अज्ञात हत्याराने उपकुन स्लायडिंगच्या खिडकीतून दुकानात प्रवेश करून गल्ल्यातील दोन लाख रुपये चोरून तो पसार झाला आहे.

या गुन्ह्याची माहिती समजताच माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी नितीनकुमार पोंदकुले, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील, महिला पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील, पोलीस उपनिरीक्षक श्री. भोजकर यांनी घटनास्थळी भेट दिली. या गुन्ह्याची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. गुन्ह्याचा अधिक तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्री. भोजकर हे करीत आहेत.

# कर्जत तालुक्यात जमीन खरेदीमध्ये फसवणूक

**नेरळ :** कर्जत तालुक्यात पुन्हा एकदा जमीन खरेदीमध्ये फसवणूक झाल्याचे प्रकरण समोर आले आहे. जमिनीच्या मालकाच्या जागी बनावट माणूस उभा करून बिनशेती प्लॉट विकण्यात आला आहे. या व्यवहारात आपली फसवणूक झाल्याचे समजताच प्लॉट विकत घेणाऱ्या मालकाने पोलीस ठाणे गाठत फसवणूक करणाऱ्या ८ जणांविरोधात तक्रार दाखल केली आहे.

राम प्रहर

वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

# खारआंबोली ते आंबोली धरण रस्ता पूर्ण

## आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते लोकार्पण



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या आंबोली धरणावर जाण्यासाठी तेथील रस्ता हा मातीचा व खड्डेमय होता. हा रस्ता डांबरीकरण व्हावा, अशी आंबोली ग्रामस्थ यांची इच्छा होती. यासाठी शिवसेनेचे उप तालुका प्रमुख मनोज कमाने तालुका संघटक दिनेश मिणमिने व दिलीप केने यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या कडे पाठपुरावा केला होत. त्यानुसार हा रस्ता पूर्ण झाल्याने त्याचे लोकार्पण आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आले.

आंबोली धरण हे पर्यटन स्थळ असून पावसाळ्यात येथील मनमोहक धबधबा व मनोसक्त पोहण्यासाठी हजारोच्या संख्येने पर्यटक येत असतात सदरचा रस्ता डांबरी करणं होणे खूप आवश्यक होते यासाठी आमदार महेंद्र दळवी यांनी जलसंपदा विभागाकडून दोन किलोमीटरचा रस्ता बनवण्यासाठी दीड कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होता. हा रस्ता पूर्ण झाल्याने असंख्य पर्यटक व स्थानिक नागरिक यांना मोठा दिलासा मिळाला आहे. रस्ता पूर्ण होताच आमदार महेंद्र दळवी यांच्या शुभ हस्ते लोकार्पण करण्यात आले.

या वेळी उप जिल्हा प्रमुख भरत बेलोसे जिल्हा संघटिका शुभांगी करडे, तालुका प्रमुख ऋषिकांत डोंगरीकर, उप तालुका प्रमुख मनोज कमाने, तालुका संघटक दिनेश मिणमिने, सी.ए म. ठाकूर, मधूशेठ पाटील, युगा ठाकूर, मंदा ठाकूर, अशोक धुमाळ, संदीप कमाने, अनिल कमाने, कोमल माळी, गणेश गोसावी, रुपेश कमाने, गणपत मोकल, मंगेश गोसावी, मंगेश खंडागळे, संकेत आर्कशी, जयदीप बैकर, दामोदर वारघे, मोहन वारघे आदी उपस्थित होते.



**नागोठणे :** येथील पत्रकार शामकांत नेरपगार यांचा नातू चिमुकला देशभक्त विहान सुनील कोकळे यानेदेखील हर घर तिरंगा या उपक्रमात सहभागी होत सैनिक वेशभूषा परिधान करून राष्ट्रध्वजाला सलामी दिली.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे:–

मौजे–वाघाची वाडी, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड.

| भुमापन नं. /हि. नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. | जमीन मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| 5/1/6 | 3–59–80<br>पो.ख. 0–61–20<br>एकूण 4–21–00 | 5.93 | 1) फियोनी जेस्टीन<br>2) गौरव फ्रांकी फर्नांडीस |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून 14 दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल.
दि. 14/08/2023.

ॲड. प्रशांत अशोक भुजबळ
कार्यालय : 2, आशादिप अपार्टमेंट
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र. : 9930369861

### तहसिलदार पनवेल यांचे न्यायालयात

क्र. कुळ कायदा कलम ७०ब केस क्र. ९/२०२२

जनार्दन जयराम म्हात्रे
रा. हरिग्राम, ता.पनवेल, जि. रायगड — अर्जदार

विरुध्द

सदाशिव कृष्णा जोशी
रा. टिळक रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

सामनेवाले यांना या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त नमुद केलेल्या प्रश्नाधीन मिळकतीबाबत अर्जदार यांनी महाराष्ट्र कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ७० ब अन्वये कुळ मिळणेबाबत दिनांक ११/११/२०२२ रोजी दावा दाखल केलेला आहे. त्याअनुषंगाने प्रथम सुनावणी दि. १३/१/२०२३ रोजी घेण्यात आलेली आहे. तदनंतर प्रस्तुत दाव्यामध्ये वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र प्रस्तुत प्रकरणातील . सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. यास्तव सदर दाव्याची पुढील सुनावणी निम्नस्वाक्षरीतांच्यासमोर दिनांक २५/८/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय पनवेल यांचे कार्यालय, साईनगर, तलाठी प्रशिक्षण केंद्र, पनवेल, जि. रायगड येथे निश्चित करण्यांत आली आहे.

सबब, या जाहीर नोटीसीद्वारे अर्जदार व सामनेवाले यांना तसेच वरील जमिन मिळकतीशी हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी दिनांक २५/८/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय पनवेल, जि.रायगड येथे समक्ष येऊन आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहीत केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत प्राप्त झाल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**दावा जमिनीचे वर्णन**

| गावाचेनाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| मौजे हरिग्राम, ता. पनवेल | ५९/६ | ०.०७.० | ०.०० |

सदरची जाहिर नोटीस आजरोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.

**ठिकाण :– पनवेल**
**दिनांक :– ११/८/२०२३**

**सही/–**
**तहसिलदार पनवेल**

### पनवेल महानगरपालिका
### जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडांचा प्रकार व संख्या | झाडे तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १. | श्री.संजय कटेकर, कार्यकारी अभियंता (प्रकल्प), बांधकाम विभाग, पनवेल महानगरपालिका | ०१ चिंचेचे झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील खारघर नोड मधील सेक्टर-२, प्लॉट नं.२१ ते सेक्टर-५, प्लॉट नं.४ ए (उत्सव चौक) गोल्फ कोर्सच्या रस्त्याने ते सेक्टर-३५जी ते सेक्टर-३४सी ते सेक्टर-३४ए ते सेक्टर २५, प्लॉट नं.२ ते सेक्टर-१५, प्लॉट नं.२४ बी ते सेक्टर-१५, प्लॉट नं.११ ते डाव्या बाजुने कोपरा प्रवेशद्वार पर्यंत ४५ मीटर रुंद रस्त्याचे पुर्न डांबरीकरण व दुभाजकाची दुरूस्ती करणे या कामामध्ये येणारे रांजणपाडा येथील स्मशानभुमी जवळ रस्त्यावर असलेले ०१ बाधित झाड तोडणेबाबत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी

जा.क्र. पमपा/उद्यान/२१२३/ प्र.क्र. ८८ /५६५ /२०२३
दिनांक :१४ /०८ /२०२३

सही /-
उपायुक्त
पनवेल महानगरपालिका

### नमुना एन. डी.

(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH9584070/ MH 9056422 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 BX1578 आणि MH46 BQ3998 चे मालक **श्री जनार्दन पांडूरंग गरुडे** यांचे तारीख २८/०६/२०२० रोजी निधन झालेले आहे.

मी श्रीमती जयश्री जनार्दन गरुडे, पत्ता : ३५ सारंग पो. चौक, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०८ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालयात निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – जयश्री जनार्दन गरुडे**
**पत्ता– ३५ सारंग पो. चौक, ता. खालापूर, जि. रायगड ४१०२०८**

# नवी मुंबईकर आजारांनी बेजार

## महानगरपालिका क्षेत्रात मलेरिया, डेंग्यूचे रुग्ण वाढले

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पावसाने विश्रांती घेतल्यानंतर नवी मुंबई शहरात मलेरिया आणि डेंग्यू यांसारख्या आजारांनी डोके वर काढले आहे. महापालिका क्षेत्रात गेल्या दहा दिवसांमध्ये मलेरियाचे १० रुग्ण, तर जुलै महिन्यात १८५ संशयित डेंग्यू रुग्णांचे अहवाल पालिकेला प्राप्त झाले आहेत. झोपडपट्टींबरोबर सिडकोनिर्मित वसाहतींमध्ये मलेरिया आणि डेंग्यूचे संशयास्पद रुग्ण मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत.

पावसाळा सुरू झाला की कीटकजन्य आजारांचे प्रमाण वाढू लागते. पावसाचे पाणी साठून डासांच्या अळ्या वेळेवर नष्ट केल्यास उत्पत्ती होत नाही. नवी मुंबई महापालिकेच्या हद्दीत ज्या भागात बांधकाम, अस्वच्छता आहे, अशा परिसरामध्ये डेंगी आणि मलेरियाच्या संशयित रुग्णांची संख्या जास्त आहे. या साथीच्या आजाराची लक्षणे असणाऱ्या रुग्णांची नवी मुंबई महापालिकेच्या नागरी आरोग्य केंद्र आणि रुग्णालयात उपचारासाठी गर्दी होत आहे. बेलापूर नोडमध्ये आग्रोळी आणि दिवाळे गावात मलेरियाचे रुग्ण आढळून आले आहेत. नेरूळ नोडमध्ये दारावे, करावे, सारसोळे, कुकशेत या गावांमध्ये डासांचा त्रास नागरिकांना जाणवत आहे. शहरातील गावठाणांसोबत सिडकोनिर्मित सोसायट्या, खासगी विकसकांच्या गृह सोसायट्यांमध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत.



कांदळवने आणि उद्यानाच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना डासांचा अधिक त्रास जाणवत आहे. अशी ठिकाणे शोधून डासआळी नष्ट करण्यासाठी कीटकनाशक फवारणी करण्याचे कामही महापालिकेच्या आरोग्य विभागाने हाती घेतले आहे, मात्र अधूनमधून पडणाऱ्या पावसामुळे डासांचे प्रमाण वाढत आहे.नवी मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागाने उपलब्ध केलेल्या आकडेवारीनुसार जुलै महिन्यात १८५ डेंगी संशयित रुग्णांचे नमुने महापालिकेला सापडले आहेत; तर १४ रुग्ण मलेरियाने बाधित असल्याचे स्पष्ट झाले आहे. ऑगस्ट महिन्यामध्येही मलेरियाच्या रुग्णांचा आकडा मोठा आहे. १ ऑगस्टपासून १० ऑगस्टपर्यंत मलेरियाचे १० रुग्ण सापडले आहेत. काही डेंगीचे संशयित रुग्णही आढळून आले आहेत.

### रुग्णालयांवरही ताण

*राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने दिलेल्या मार्गदर्शक नियमावलीनुसार ताप येणाऱ्या व्यक्तीचे नमुने घेऊन ते पुण्यातील शासकीय प्रयोगशाळेत तपासण्यासाठी पाठवून दिले जातात. या नमुन्यांचा अहवाल बाधित असल्यानंतर महापालिकेतर्फे अधिकृतरीत्या डेंगीचा रुग्ण म्हणून जाहीर केला जातो. मात्र, याकरिता १० ते १५ दिवसांचा वेळ जात असल्याने बऱ्याचदा रुग्ण बरा होऊन गेल्यानंतर डेंगीबाधित असल्याचे समजते. तोपर्यंत खासगी रुग्णालयांमध्ये जाऊन उपचार घेण्यावर भर दिला जात आहे.*

# आमदार महेश बालदी यांच्या निधीतून रस्ते कॉँक्रीटीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल तालुक्यातील कर्नाळा नाका येथील रस्त्यांची दुरवस्था झाली असून अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या या रस्त्याच्या कामाला भाजप पदाधिकारी व गावकरी यांच्या उपस्थित सुरुवात झाली आहे. रविवारी (दि. १३) माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत याच्या हस्ते रस्ते कामाचे भूमिपूजन झाले. आमदार महेश बालदी यांच्या स्थानिक विकास निधी अंतर्गत या रस्त्यांचे कॉँक्रीटीकरण होत आहे.

या वेळी ज्ञानेश्वर घरत म्हणाले की, कर्नाळा ग्रामपंचायतीमधील भारतीय जनता पक्षाचे सर्व कार्यकर्त्यांनी आमदार महेश बालदी यांच्याकडे पाठपुरावा केला. त्याअनुशंगाने आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली या कामाची पूर्तता होतेय. त्यानुसार आज या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यासोबतच डोलघर येथील मंदिराच्या सभामंडपासाठीही आमदार महेश बालदी यांच्याकडे पाठपुरावा करू, ग्रामपंचायत निवडणूकीच्या वेळेस गावासाठी पाण्याची लाईन टाकण्यात आली.

स्मशानभूमी, हायमास्ट, शेडसाठीही भाजप पदाधिकार्यांनी पाठपुरावा करून कामे करवून घेतली आहेत. भूमिपूजन कार्यक्रमाला कर्नाळा ग्रामपंचायतीमधील भारतीय जनता पक्षाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. यामध्ये पनवेल तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, कर्नाळा विभागीय भाजप अध्यक्ष बाळूशेठ पाटील, भाजप नेते गणेश पाटील, कर्नाळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजू पाटील, केळवणे पंचायत समिती भाजपचे युवा मोर्चा अध्यक्ष सुशील घरत, भाजप गाव अध्यक्ष जितेंद्र पाटील, भाजप कार्यकर्ते हरेश्वर पाटील, दीपक पाटील, दिनेश पाटील मुरलीधर पाटील, संदीप पाटील, राजेश रसाळ, प्रशांत म्हात्रे, निलेश पाटील, करण पाटील, संदीप पाटील, केळवणे भाजप कार्यकर्ता विलास ठाकूर, योगेश घरत आदींसह महिला, ग्रामस्थ उपस्थित होते.

## रिटघर विद्यालयात मोफत गणवेश, दप्तरवाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



श्री भैरवदेव विद्यालय व लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय येथे सोमवारी (दि. १४) शालेय गणवेश व दप्तर वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कृष्णा पाटील व स्कूल कमिटीचे सर्व सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक यांनी कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेचे पूजन केले.

विद्यालयातील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व दफ्तर वाटप कृष्णा पाटील, बळीराम भोपी, राजेश भोपी, विष्णू भगत, वंदना भोपी, मुख्याध्यापक बी. बी. साळुंखे व सर्व शिक्षक यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. विद्यालयातील सर्व शिक्षकांनी वर्गणी काढून आर्थिक सहाय्य स्वरुपात इयत्ता पाचवीच्या सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेश वाटप केले. तसेच ज्ञानवर्धिनी विद्यालय चारकोप कांदिवली यांच्याकडून १५ दप्तर देण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ए. ए. पाटील, प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक साळुंखे सर यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार गंधे मॅडम यांनी मानले.

## मुलांसह विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** करंजाडे पाडा येथून एक विवाहित महिला आपल्या दोन मुलांना घेऊन बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



अब्दुल रशीद खान (वय ३५) याने त्याची पत्नी मीनारा अब्दुल रशीद खान व मुले समी, रहीम करंजाडे पाडा येथून १० ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजेपासून बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल शहर पोलिसांकडे केली. बेपत्ता मीनारा (वय २६) अंगान सडपातळ, रंग गोरा, उंची पाच फूट दोन इंच, अंगात निळा गाऊन व बुरखा आहे. सोबत समी (वय १०), रहीम (वय आठ) ही दोन मुले आहेत. हि महिला दिसल्यास ९३२४९९८०८३ अथवा ७७१८९८०५९५ या क्रमांकावर साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मंगळागौर स्पर्धेत साईभक्त महिला फाउंडेशन प्रथम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात श्री गोवर्धनी सार्वजनिक सेवा संस्थेच्या अध्यक्षा आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत खेळ खेळूया मंगळागौरीचा हा सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

या वेळी आयोजित उत्कृष्ट समूह नृत्य स्पर्धेत शारदा पांडुरंग आमले यांच्या नेतृत्वाखाली साईभक्त महिला फाऊंडेशनने प्रथम क्रमांक पटकाविला. उद्योगिनी ग्लोबल वेलनेसच्या अम्बेसेडर रेखा चौधरी, सिडको जनसंपर्क अधिकारी प्रिया रतांबे, सामाजिक कार्यकर्त्या उषा दत्ता यांच्या उपस्थितीत रोख रक्कम, प्रमाणपत्र आमदार मंदा म्हात्रे यांनी प्रदान केले. खेळ खेळूया मंगळागौरी या कार्यक्रमात सानपाडा विभागातील सुमारे दीडशे स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.



**पनवेल : स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त घरोघरी तिरंगा उपक्रमांतर्गत भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी त्यांच्या शेलघर येथील निवासस्थानी राष्ट्रध्वज फडकवून सलामी दिली.**
















# आगरदांडा येथे रेल्वे धावणार

## ■ शासनाकडून ६५ शेतकऱ्यांना भूसंपादनासाठी नोटीस

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील आगरदांडा व श्रीवर्धन तालुक्यातील दिघी या ठिकाणी येथे दोन मोठी बंदरे विकसित करण्यात येत आहेत. दिघी येथील बंदर विकसित झाले असून बंदरात बोटीमार्ग येणारा कच्चा माल नियोजित ठिकाणी नेण्यासाठी रेल्वे मालगाडी आवश्यकता आहे. त्यासाठी आगरदांडा ग्रामपंचायत परिसरातील जागेवर रेल्वेरूळाची अधिकृत रेखाटणी केली गेली आहे.

सुमारे ३५०० कोटी रुपयांची गुंतवणूक असलेले व एक आंतरराष्ट्रीय बंदर म्हणून विकसित होणारे दिघी पोर्टकडे मोठ्या अपेक्षेने पहिले जात आहे. या बंदरासाठी १६०० एकर जमीन आगरदांडा व दिघी परिसरातील घेण्यात आलेली आहे. राजपुरी खाडीतील या बंदराचा विकास आणि त्यानंतर कारभार चालविण्यासाठी ५० वर्षांची सवलत केंद्र सरकारने दिलेली आहे. हे बंदर फ्रेट कॉरिडोरचाही एक भाग असून ते लवकरात लवकर कार्यान्वित व्हावे यासाठी बंदर विभागाचे प्रयत्न सुरू आहेत.



रेल्वेमार्गासाठी लागणाऱ्या भूसंपादनात ज्यांच्या जमिनी जाणार आहेत त्यांना महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ यांच्या कलम ३२ (२) खालील व्यक्तिगत नोटीस अलिबाग उपविभागीय अधिकारी यांच्याकडून देण्यात आल्या आहेत. अदानी पोर्टर ॲण्ड लॉजिस्टीक पार्क कंपनीकरिता रोहा जंक्शन ते आगरदांडा पोर्ट रेल्वे लाईनसाठी तालुक्यातील उसडी, आगरदांडा, नांदले व हाफीजखार या गावातील ६५ जणांची १७६४.७३ हेक्टर जमीन रेल्वे ट्रॅकमध्ये जाणार आहे. त्यांना २७ जुलै रोजी नोटीस देण्यात आल्या असून याबाबत व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल तर या नोटीसीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत भेटीची वेळ ठरवून कोणत्याही कामाच्या दिवशी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत स्वत: किंवा कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल, अशी माहिती उपविभागीय अधिकारी यांनी नोटीसमध्ये नमूद केले आहे.

आगरदांडा ग्रामपंचायत परिसरातून रेल्वेची मालगाडी येत असल्याने पंचक्रोशी भागातील व मुरूड शहरातील नागरिकांकडून आनंद व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीला बाजारभावाप्रमाणे दर देण्यात यावा, अशी मागणी केली आहे. शेतकऱ्यांना योग्य भाव मिळाल्यास जमीन हस्तांतरण प्रक्रिया सोपी होणार आहे. दिघी बंदरात येणारा माल हा मालगाडीच्या साह्याने विविध ठिकाणी पोहचवण्यासाठी येथे केंद्र सरकारच्या परवानगीने रेल्वे आणण्यात आली आहे. रेल्वे आल्याने बंदराच्या विकासाबरोबरच परिसरात दळणवळणाचे साधन लोकांना उपलब्ध होणार आहे.

# अलिबागेत स्वातंत्र्यसैनिकांच्या शिलाफलकाचे अनावरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या माझी माती, माझा देश या अभियानांतर्गत अलिबाग नगर परिषदेच्या वतीने सोमवारी (दि. १४) हिराकोट तलाव येथील उद्यानात शिलाफलकाचे अनावरण जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते करण्यात आले.



अभियानातील पाच कार्यक्रमापैकी एक स्वातंत्र्य चळवळीतील हुतात्म्यांना अभिवादन कार्यक्रम आहे. या अंतर्गत या शिलाफलकाची उभारणी करण्यात आली आहे. या वेळी सर्व हुतात्म्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमास अलिबाग नगर परिषद मुख्याधिकारी तथा प्रशासक अंगाई साळुंखे, तहसीलदार विक्रम पाटील, पोलीस निरीक्षक शिरीष पवार, जिल्हा प्रशासन अधिकारी श्याम पोशेट्टी, नायब तहसीलदार अजित टोळकर, नगर परिषद कर्मचारी, नागरिक, पालिकेच्या उर्दू शाळेचे तसेच जे.एस.एम कॉलेजचे विद्यार्थी उपस्थित होते.

# खोपोलीत माजी सैनिकांच्या उपस्थितीत पंच प्रण शपथ



**खोपोली : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव समारोपानिमित्ताने खोपोली नगर परिषद येथे माझी, माती मेरा देश अभियान राबविण्यात आले. त्या अनुषंगाने अग्निशमन केंद्र येथे पंच प्रण शपथ कार्यक्रम झाला तसेच या अंतर्गत शेडवली येथे वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमास मुख्याधिकारी तथा प्रशासक अनुप दुरे, उपमुख्याधिकारी गौतम भगळे, माजी सैनिक, माजी नगरसेवक मोहन औसरमल, सुनील पाटील, अमोल जाधव, अधिकारी प्रवीण भोये, निशिकांत सुर्वे व कर्मचारी होते.

# मोरे महाविद्यालयात नवमतदार नोंदणी शिबिर

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव येथील एम. बी. मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालयात १२ ऑगस्ट रोजी नव मतदार नोंदणी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी एकूण २९ नव मतदार विद्यार्थिनींचे फार्म भरून घेण्यात आले आणि अजूनही विद्यार्थ्यांचे फॉर्म भरुन घेणे सुरू आहे.



या शिबिरात महसूल, नायब तहसीलदार प्रज्ञा काकडे व रोहा मंडळ अधिकारी भरत सावंत यांनी विद्यार्थिनींना निवडणूक आयोगाचा विशेष नवमतदार नोंदणी कार्यक्रम, मतदार नोंदणीसाठी पात्रता, अर्ज सादर करण्याची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आदी मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थिनींच्या प्रश्नाचे निरसनही केले.

ग्रंथालयातील स्पर्धा परीक्षा विभागाचे उद्घाटन परिविक्षाधीन तहसीलदार प्रज्ञा काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी नव मतदार नोंदणी व स्पर्धा परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना विस्तृत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य प्रसन्न म्हशेलकर, माधुरी जाधव, अक्षता ठाकूर, ग्रंथपाल निर्मला थोरात व मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या. प्रास्ताविक प्राचार्य म्हसळकर, सूत्रसंचालन थोरात यांनी केले, तर आभार एनएनएस विभाग प्रमुख प्रा. मयूर पाखर यांनी मानले.

# पावसाची उघडीप

**अलिबाग : प्रतिनिधी**

पावसाने सध्या विश्रांती घेतली असून कोकण विभागात १४ ऑगस्ट रोजी सरासरी ०६.४ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

सर्वाधिक पावसाची नोंद रत्नागिरी जिल्ह्यात ०९.७ मिमी झाली आहे. याशिवाय ठाणे ०५.८ मिमी, पालघर ०२.८ मिमी, रायगड ०६.६ मिमी, सिंधुदुर्ग ०४.१ मिमी अशी आकडेवारी आहे. कोकण विभागात आतापर्यंत एकूण २०७२.५ मिमी पाऊस पडला आहे.

गेल्या महिन्यात पंधरवड्यानंतर जोरदार बरसलेल्या वरुणराजाने नंतर मात्र विश्रांती घेतली आहे. ऑगस्टमध्येही उघडीप आहे.

# माणगाव नगरपंचायत कार्यालयात ध्वजारोहण

**माणगाव : प्रतिनिधी**

केंद्र व राज्य सरकारच्या घरोघरी तिरंगा कार्यक्रमांतर्गत माणगाव नगरपंचायत कार्यालय ठिकाणी पटांगणात रविवारी (दि. १३) उपनगराध्यक्ष राजेश मेहता यांच्या हस्ते ध्वजारोहण कार्यक्रम झाला.



केंद्र व राज्य सरकारने भारताच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही १३ ते १५ ऑगस्ट तीन दिवस घरोघरी तिरंगा मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने माणगाव नगरपंचायत कार्यालय या ठिकाणी रविवारी सकाळी ध्वजारोहण करण्यात येऊन सामुदायिक राष्ट्रगीत घेण्यात आले.

या वेळी कार्यक्रमास नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माजी उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, पाणीपुरवठा समिती सभापती कपिल गायकवाड, स्वच्छता समिती सभापती दिनेश रातवडकर, मुख्याधिकारी संतोष माळी, नगरपंचायतीचे कर्मचारी, ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालयाचे कर्मचारी आदी उपस्थित होते.

# ‘नवजात बालकासह आईच्या आरोग्यासाठी स्तनपान महत्त्वाचे’

**चौक : प्रतिनिधी**

नवजात बालकांना आरोग्यासाठी स्तनपान करून देणे हे माता आणि नवजात बालकांना त्यांच्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे स्तनपान होणे अतिशय महत्त्वाचे आहे, असा सल्ला पर्यवेक्षक आरती तेलखडे यांनी दिला आहे.



एकात्मिक बाल विकास प्रकल्प अंतर्गत स्तनपान सप्ताह सुरू असून प्रत्येक अंगणवाडी व बालवाडीत स्तनपान सप्ताह आयोजिला जात आहे. चौक येथील या सप्ताह कार्यक्रमात तेलखडे बोलत होत्या. त्या पुढे म्हणाल्या प्रसुतीनंतर नवमातांचे वजन लवकर कमी होते, त्याचप्रमाणे प्रसुतीनंतरचा तणाव आणि रक्तस्त्राव कमी करायला स्तनपानाने मदत होते. प्रसुतीनंतर नियमितपणे स्तनपान करवल्यास स्तन आणि गर्भाशयाच्या कर्करोगाची शक्यताही कमी करता येते. बाळाच्या संगोपनाचा काळ जितका अधिक तेवढा धोका कमी होतो. आईच्या दुधातील ॲन्टीबॉडीज बाळाला आजारापासून वाचवण्यास मदत करतात. स्तनपानाचे बाळ आणि माता दोघांसाठीही आरोग्य फायदे आहेत. आईचे दूध बाळाला आदर्श पोषण प्रदान करते आणि वाढ आणि विकासास समर्थन देते. स्तनपानामुळे बाळाला आणि आईला काही आजारांपासून संरक्षण मिळू शकते.

या वेळी नवमाता व नववधू यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. नवजात बालक, माता यांच्या पोषण आहाराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे, त्याचेही अवगत करण्यात आले. या कार्यक्रमास नवमाता, नववधू, अंगणवाडीसेविका, मदतनीस, आशा वर्कर, वैद्यकीय मदतसेवा कर्मचारी, गृहिणी उपस्थित होते.

# युवासेना शिव दल संघटनेच्या राज्य प्रमुखपदी चंदन शर्मा

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील पेडली येथील चंदन कपूरचंद शर्मा यांची युवासेना शिव दल संघटनेच्या महाराष्ट्र राज्य प्रमुखपदी नुकतीच निवड करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय प्रमुख संजय बोथरा यांना हे नियुक्तीपत्र देण्यात आले.

या कार्यक्रमास शिव दल महिला प्रमुख मृणाली पटेल, दिव्य भारत न्यूज चॅनेल चीफ करणसिंह राजपूत, राष्ट्रीय सचिव प्रशांत गोमासे, गुजरात राज्य प्रमुख सचिन पाटील, अहमदाबाद जिल्हा प्रमुख किरण ठाकूर, संभाजीनगर महिला प्रमुख दुर्गा भाटी, नवीन सॅन, के. के. शुक्ला, दिनेश कुमावत आदी पदाधिकारी उपस्थित होते. नियुक्तीबद्दल चंदन शर्मा यांचे अभिनंदन होत आहे.



# महागाव येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**माणगाव : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत महागाव येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत माझी माती, माझा देश अभियान राबविण्यात येत आहे. यामध्ये ग्रामपंचायतीत विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायतीजवळ शिलाफलकाची उभारणी करून त्यावर प्रधानमंत्री यांचा संदेश व गावातील स्वातंत्र्यसैनिक गजानन नाचणकर यांच्या कार्याची नोंद रेखाटण्यात आली आहे.



शिलालेखाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले. या वेळी ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन पंच प्रण प्रतिज्ञा घेतली. ग्रामपंचायत सीमा हद्दीत ७५ देशी झाडांची लागवड करण्यात आली तसेच दोन मूठ माती अमृत कलशमध्ये जमा करण्यात आली.

या कार्यक्रमास ग्रामपंचायत सरपंच सुषमा कसबले, उपसरपंच सचिन जाधव, सदस्य कानू पिंगळे, वंदना कालेकर, मनीषा कापरे, नंदिनी कडव, ग्रामसेवक सुवर्णा तांबडे, ग्रामस्थ संतोष आमले, कृष्णकांत मानकर, गणेश दळवी, गंगाराम कोळी, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका व इतर उपस्थित होते.

# वीरपत्नी सुनीता बांदल यांच्या हस्ते पोलादपूर नगरपंचायत येथे ध्वजारोहण



**पोलादपूर : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त पोलादपूर नगरपंचायत कार्यालयाबाहेर शहीद पत्नी सुनीता तानाजी बांदल यांच्या हस्ते सोमवारी (दि. १४) ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार तसेच शिलाफलकाचे अनावरण आदी उपक्रम झाले.

या कार्यक्रमास नगराध्यक्ष सोनाली गायकवाड, उपनगराध्यक्ष नागेश पवार, सभापती प्रसाद इंगवले, सभापती अस्मिता पवार, श्रावणी शहा, शिल्पा दरेकर, स्नेहा मेहता, अंकिता जांभळेकर निकम तसेच महादेव सरंबळे व नगरपंचायतीचे कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी वीरपत्नी सुनीता बांदल, स्वातंत्र्यसैनिक जगन्नाथ डंबे यांच्या पत्नी, शहीद राकेश सावंत यांचे वडील तात्याबा आणि आई जयश्री, आद्यपत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त पत्रकार शैलेश पालकर, दिव्यांगांची माता मंजुषा साबळे, सेवानिवृत्त कर्मचारी गणपत मोरे, स्व.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे स्वच्छतादूत श्रीसदस्यांतर्फे रूपेश जाधव, नरवीर रेस्क्यू टीमतर्फे सचिन मेहता, माजी स्वीकृत सदस्य राजन पाटणकर आदींचा सत्कार करण्यात आला. यानंतर पोलादपूर शहरातील शिवाजीनगर व जोगेश्वरी गाडीतळ परिसरातील क्षणभर विश्रांती या ठिकाणी स्वातंत्र्याच्या बसविण्यात आलेल्या शिलाफलकाचे अनावरण करण्यात आले.

# माणगावमध्ये माहेरवाशिणींचा स्नेहमेळावा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील खांदाड गावातील माहेरवाशिणींचा स्नेहमेळावा नुकताच वाकडाई उतेखोल येथील रिव्हरलँड रिसोर्ट येथे भरला होता. हा स्नेहमेळावा उत्साहात झाला.

प्रदीर्घ काळानंतर बालमैत्रिणी एकत्र जमल्याने सर्वजणी आपल्या बालपणीच्या आठवणीत रमल्या होत्या. अनेकजणी आठवणी सांगत भारावून गेल्या. तेव्हाची परिस्थिती हलाखीची असली तरी बालपण मात्र सुखात गेले. आताच्या पिढीला तसे बालपण जगायला मिळत नाही. खांदाड येथेच पुन्हा एकदा बालपण अनुभवायला मिळावे अशी अनेकींनी इच्छा व्यक्त केली.

या स्नेहमेळाव्यास नैना यादव, बाली यादव, साधना यादव, सुवर्णा यादव, अपर्णा घर्वे, बाली शेलार, मिनू शेलार, अर्चना शेलार, अश्विनी शेलार, शीतल घर्वे, पिंकी घर्वे, उज्वला कदम, माधवी कदम, कविता सावंत, पिंकी सावंत, मानसी दळवी, अपूर्वा दळवी, पूनम कनोजे, भारती कनोजे, आशा सांगले, सुनीता पवार, पिंकी साबळे, सविता शिंदे, बंटी साबळे, सुजा पाटील, शैला जाधव, बाली साबळे आदी खांदाड माहेरवाशीणी उपस्थित होत्या. पुन्हा एकदा भेटू असे एकमेकींना वचन देत उत्साहपूर्ण वातावरण सगळ्या जणींनी निरोप घेतला.



# अपघातग्रस्त व्यक्तीला केली मदत

**मुरूड : प्रतिनिधी**

भोईघर येथील सागर महाडिक मुरुडकडे येत असताना एक अवघड वळणार मोटरसायकलचा ताबा गेल्यामुळे मजगाव येथील घराजवळ अपघात होऊन गाडी एका झाडाला ठोकली. यात महाडिक गंभीर जखमी झाले. त्याच वेळी नांदगाव येथील प्रसिद्ध वकील आशिष देशपांडे हे याच रस्त्यावरून जात असताना त्यांनी जखमी व्यक्तीला स्वतःच्या गाडीने मुरुड येथील ग्रामीण रुग्णालय येथे पोहचवण्यात मोलाचे सहकार्य केले, तसेच त्याच्या नातेवाईकास या अपघाताची माहिती दिली.

सागर महाडिक याचे वय २८ असून गाडीचा वेग जास्त असल्याने मजगाव येथील अवघड वळणावर गाडी ताब्यात न राहिल्याने ती आदळून त्याच्या डोक्याला दुखापत झाली. त्याला अधिक उपचारसाठी पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात हलवण्यात आले आहे. ॲड. देशपांडे यांनी वेळीच मदत केल्याने सागरला योग्य ती वैद्यकीय मदत मिळण्यास मदत झाली.

७६ आजादी का अमृत महोत्सव

स्वातंत्र्य दिनाच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा!

झाडे लावा, झाडे जगवा..!

माझी माती, माझा देश
मातीला नमन, विरांना वंदन

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत दुंदरे

ता. पनवेल, रायगड

श्री. एम. डी. पाटील (ग्रामविकास अधिकारी)

श्रीमती. प्रतिभा ढोक (प्रशासक)

स्वातंत्र्य दिनाच्या सर्व नागरिकांना मन:पूर्वक शुभेच्छा!

७६ आजादी का अमृत महोत्सव

माझी माती,
माझा देश
मातीला नमन,
विरांना वंदन

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत कराडे खुर्द

सरपंच
सौ. भारती हेमंत चितळे

उपसरपंच
सौ. प्रमिला योगेश पाटील

ग्रामसेवक अधिकारी
श्री. निवृत्ती आंधळे

श्री. मुकेश परशुराम पाटील (सदस्य)
सौ. मीनल धनाजी ठोंबरे (सदस्या)
सौ. यशश्री योगेश मुरकुटे (सदस्या)
श्री संतोष दत्तात्रेय म्हात्रे (सदस्य)
सौ. नलिनी नथुराम कारंदे (सदस्या)
सौ. रेवती रवींद्र भोईर (सदस्या)
सौ. माधुरी प्रशांत चितळे (सदस्या)
श्री. नितेश नाथा कारंदे (सदस्य)

सर्व कर्मचारी वर्ग

झाडे लावा, झाडे जगवा..!

स्वातंत्र्य दिनाच्या सर्व नागरिकांना मन:पूर्वक शुभेच्छा!

७६ आजादी का अमृत महोत्सव

माझी माती, माझा देश
मातीला नमन,
विरांना वंदन

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत खानावले

सरपंच
सौ. जयश्री सुभाष नाईक

उपसरपंच
श्री. मोहन बाळाराम लबडे

ग्रामसेवक
श्री. रमेश नामदेव तारेकर

श्री. जगदीश सदानंद पाटील (सदस्य)
श्री. गणेश सुनील कातकरी (सदस्य)
सौ. किर्ती संतोष लबडे (सदस्या)
सौ. रविना बाळाराम पाटील (सदस्या)
सौ. प्रतिक्षा रघुनाथ सोनावळे (सदस्या)
सौ. वनिता महेंद्र पाटील (सदस्या)
सौ. वैशाली गणेश आगिवळे (सदस्या)

हनुमंत वाघू लबडे (लेखनिक), सुभाष शंकर नाईक (शिपाई), भास्कर दत्तात्रेय दिसले (दिवाबत्ती कर्मचारी), भारती गणेश पाटील (लेखनिक), केशव धोंडू कातकरी (सफाई कामगार), दिनेश बाळाराम पाटील (घंटागाडी चालक)

स्वच्छता म्हणजे रोजचाच सण, नाहीतर कायमचे आजारपण!

सर्व नागरिकांना
स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत बांधपाडा-खोपटे

सौ. विशाखा प्रशांत ठाकूर (सरपंच)
श्री. सुजित भालचंद्र म्हात्रे (उपसरपंच)
श्री. रविंद्र मधुसूदन म्हात्रे (ग्रामविकास अधिकारी)

श्री. राजश्री प्रितम पाटील (सदस्या)
श्री. देवानंद कमलाकर पाटील (सदस्य)
श्री. शुभांगी अविनाश ठाकूर (सदस्या)
श्री. रितेश सदानंद ठाकूर (सदस्य)
सौ. मिनाक्षी धिरज म्हात्रे (सदस्या)
सौ. करिष्मा कमळाकर म्हात्रे (सदस्या)
सौ. संदेश चंद्रकांत म्हात्रे (सदस्य)
सौ. जागृती लक्ष्मण घरत (सदस्या)
श्री. अच्युत दत्तात्रेय ठाकूर (सदस्य)

झाडे लावा, झाडे जगवा..!

सटल करंडक

वर्ष-४ थे

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पनवेल शाखा आणि
श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल
यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# जिल्हास्तरीय मायबोली एकपात्री व द्विपात्री अभिनय स्पर्धा

प्रवेश मर्यादित

भाषा - मराठी
वयोमर्यादा : शालेय गट ५ वी ते १० वी,
व खुला गट

विषय संदर्भात : सद्यस्थितीतील नाविन्यपूर्ण विषय असल्यास विशेष प्राधान्य.

एकूण - ३०,००० रु पर्यंतची पारितोषिके
विजेत्यांना आकर्षक चषक
सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र.

२३ ऑगस्ट २०२३ पर्यंत आपले ऑडिशन व्हिडिओ ( वेळ मर्यादा - ५ मिनिटे )
natyaparishad.panvel@gmail.com ह्या ई-मेल वर पाठवावेत.

: संपर्क :
अमोल खेर - 9820233349
गणेश जगताप - 9870116964



प्रशांत ठाकूर
आमदार - पनवेल विधानसभा
अध्यक्ष: अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पनवेल शाखा

परेश ठाकूर
मा.सभागृह नेता - प. म.पा
उपाध्यक्ष - अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पनवेल शाखा



७६ आजादी का अमृत महोत्सव

स्वातंत्र्य दिनाच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा!

माझी माती,
माझा देश
मातीला नमन,
विरांना वंदन

झाडे लावा,
झाडे जगवा..!

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत वेश्वी

ता. उरण, रायगड

श्री. संदिप गणपत कातकरी (सरपंच)
श्री. सुनिल विजयकांत तांबोळी (प्रभारी सरपंच- उपसरपंच)

सौ. जोत्सना संदिप पाटील (सदस्या)
सौ. निकीता दिली मोहिते (सदस्या)
श्री. अजित वसंत पाटील (सदस्य)
श्री. सोनाली विलास पाटील (सदस्या)
सौ. प्रमिला महेंद्र मुंबईकर (सदस्या)
सौ. नुतन प्रितम मुंबईकर (सदस्या)
श्री. संदिप जयवंत पाटील (सदस्य)

श्रीम. रेश्मा जगन्नाथ ठाकूर (ग्रामसेविका अधिकारी)

७६ आजादी का अमृत महोत्सव

आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

स्वच्छता म्हणजे रोजचाच सण,
नाहीतर कायमचे आजारपण!

माझी माती, माझा देश
मातीला नमन, विरांना वंदन

स्वातंत्र्य दिनाच्या सर्व
नागरिकांना हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत कोन

(ता. पनवेल)

श्री. रमेश तारेकर (ग्रामविकास अधिकारी)

श्री. विश्वनाथ पांडुरंग म्हात्रे (प्रशासक)

झाडे लावा, झाडे जगवा..!